# अरबेत

वि. आ. वेलणकर

MR
891.462
V 425 A

MR
891.462
V425 A

सा र स्व त

भा. वि. वरेरकर ह्यांचे नाट्यसाहित्य

## नाटके

| | | | |
|---|---|---|---|
| कुंजविहारी | १९०८ | त्याची घरवाली | १९३८ |
| संजीवनी | १९१० | भाग्याचा भगवंत | १९३८ |
| सरस्वती | १९१३ | रंगभूमीच्या वाटेवर | १९३९ |
| वरवर्णिनी | १९१३ | उडती पाखरे | १९४१ |
| हाच मुलाचा बाप | १९१६ | माझ्या कलेसाठी | १९४१ |
| समर्थ भिकारी | १९१६ | सारस्वत | १९४१ |
| लयाचा लय | १९१९ | चला लढाईवर | १९४१ |
| संन्याशाचा संसार | १९१९ | न मागता | १९४४ |
| सत्तेचे गुलाम | १९२२ | सिंगापुरातून | १९४४ |
| तुरुंगाच्या दारात | १९२३ | संन्याशाचे लग्न | १९४५ |
| नवा खेळ | १९२४ | धरणीधर | १९४६ |
| कर-ग्रहण | १९२७ | खेळघर | १९४७ |
| करीन ती पूर्व | १९२७ | जिवाशिवाची भेट | १९५० |
| सोन्याचा कळस | १९३२ | दौलतजादा | १९५० |
| जागती ज्योत | १९३३ | भूमिकन्या सीता | १९५० |
| स्वयंसेवक | १९३४ | तिलाच ते कळते | १९५१ |
| समोरासमोर | १९४७ | द्वारकेचा राजा | १९५२ |
| कोरडी करामत | १९३८ | अपूर्व बंगाल | १९५३ |

लंकेची पार्वती १९५३

## लघुनाटके

| | | |
|---|---|---|
| वज्र कुसुम १९१३ | संसार १९३२ | आजचे संवाद १९३० |
| नामानिराळा १९१३ | पापी पुण्य १९३१ | सदा बंदीवान १९३३ |

## एकांकिका

■ तुफान १९३४ ■ कडकलक्ष्मी १९४५ ■ जागलेली आई १९५० ■ वरेरकरांच्या एकांकिका १ : १९६१ ( चंद्रकोरी १९५१, शुभमंगल १९५९ नवा वैरागी १९५३ ) ■ वरेरकरांच्या एकांकिका २ : १९६१ ( पुन्हा गोकुळ १९५९, प्रजापति, लंडन १९५९, तिच्या नवऱ्याचे माहेर १९६० ) ■ वरेरकरांच्या एकांकिका ३ : १९६२ ( नवा जमाना १९५०, ती का गेली ? १९५९, तीन आत्महत्त्या आणि एक पोरगी १९५९ ) ■ अनुराधा १९६०.

Saraswat

# सा र स्व त

भार्गवराम विठ्ठल वरेरकर

Bhargavram Vitthal Varerkar

Popular, Bombay

पॉप्युलर प्रकाशन मुंबई

© माया चिटणीस

पहिली आवृत्ती १९४१

दुसरी आवृत्ती १९७१/१८९३

या नाटकासंबंधीचे सर्व हक्क माया चिटणीस यांजकडे आहेत. आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगी – मूल्य या संबंधात या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

श्रीमती माया चिटणीस
हाजी कासमवाडी
फ्रेंचब्रिज, मुंबई ७

55474
16·11·76

MR
891.462
V 425 S

मुद्रक : मो. स. लाटकर
सरस्वती मुद्रणालय,
७६ ( ई ) पिंपरी इंडस्ट्रिअल इस्टेट,
भोसरी, पुणे २६

प्रकाशक : ग. ग. भटकळ,
पॉप्युलर प्रकाशन,
३५ सी ताडदेव रोड,
मुंबई ३४ W B

Library IIAS, Shimla
MR 891.462 V 425 S
00055474

# प्रस्तावना

१९०८ साली रंगभूमीवर आलेल्या 'कुंजविहारी' या माझ्या पहिल्या नाटकापासून आजच्या या नाटकापर्यंत येताना प्रत्येक वेळी मला परंपरेशी टक्कर द्यावी लागली आहे. आमच्या प्रमाणेच आम्हाला सक्तीने गुरुस्थानी झालेले, ब्रिटिश साहित्याचार्यही परंपरेचे गुलाम आहेत. त्यांचे अनुकरण करणे परिस्थितीने आम्हाला भाग पाडले आणि त्यामुळे मुळातच असलेल्या आमच्या वाङ्मयाच्या क्षेत्रातही आमची व्हावी तशी प्रगती झाली नाही. संगीताचार्यांनी संगीतासाठी लावून दिलेले नियम, भरतमुनींनी नाट्यलेखनाला घातलेल्या मर्यादा या श्रुतिस्मृतींच्या मर्यादेइतक्याच काटेकोरपणे पाळण्याचा अट्टाहास धरल्यामुळे नवे तंत्र निर्माण करण्याऱ्याची सारखी गळचेपी होत आली आहे. पहिल्या नाटकाच्या वेळी जो अनुभव मला आला तोच अनुभव गेल्या महिन्यात निघालेल्या ' माझ्या कलेसाठी ' या नाटकापर्यंत मला प्रत्येक नाटकाच्या वेळी येत गेला. तुमच्या नाटकाचा विषय अपरिचित आहे. हे पालूपद प्रत्येक नव्या नाटकाच्या वेळी मला ऐकावे लागले आहे हाच माझा विशेष आहे असे मी समजतो.

लेखनाच्या तंत्राच्या बाबतीत कोणत्या ना कोणत्यातरी परदेशी वाङ्मयनिर्मीत्याचे उदाहरण देण्याची परंपरा आमच्या गुलामी वृत्तीला साजेशी असली तरी स्वातंत्र्याला पारिपोषक नाही हे कुणाही समंजस व्यक्तीला कबूल करावे लागेल. एके काळी ब्रिटिश तंत्राचा उदो-उदो केला जात होता. आज रशियन तंत्राचा डांगोरा पिटला जात आहे. उदाहरण कुणाचेही घेतले तरी आमचा नंबर दुसराच येतो. राजकीय स्वातंत्र्याच्या अभावी पहिले स्थान पटकाविणे भारतीयाला आज अशक्य होऊन बसले आहे. लेखनाला-विशेषतः नाट्यलेखनाला-जी सरकारी कायद्याची बंधने आहेत त्यामुळे लेखणीचे टोक कितीही तीक्ष्ण असले तरी ते बोथट करूनच वाङ्मय-विशेषतः नाट्यवाङ्मय-निर्माण करावे लागते याची जाणीव काही बेजबाबदार टिकाकारांना झालेली दिसत नाही. रंगभूमीवर आणल्या जाणाऱ्या नाटकाला कोणत्या परिस्थितीतून जावे लागते हे ज्यांना यत्किंचितही माहीत नाही त्यांच्या हाती आज टीकाकाराची लेखणी आली आहे. कितीही विरोधी असली तरी सुयोग्य टीका प्रामाणिक लेखकाला आदरणीय वाटते. . .नव्हे उत्साहवर्धक वाटते. ही टीका कितीही दोषैक दृष्टीची असली तरीही दोष दखविण्याची वृत्ती निर्दोष असली तर कोणत्याही लेखकावर त्याचा दुष्परिणाम होता कामा

नये. वाङ्मयनिर्मितीला जे सामर्थ्य लागते त्यापेक्षा टीकाकार जास्त समर्थ असला– निदान तुल्यबल असला– तरच ती टीका यथार्थ होऊ शकते. 'तोतयाचे बंड' नाटकावर कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी लिहिलेल्या टीकेच्या तोलाची टीका लिहिण्याचे सामर्थ्य असलेल एकतरी लेखक आज दाखवून देता येईल काय ? 'प्रेमाभास' नाटकावरची यांचीच टीका दोषैक दृष्टीने लिहिलेली आहे. पण ते दोषदिग्दर्शन ज्या सामर्थ्याने केले आहे तेवढे सामर्थ्य आज कितीशा टीकाकारांच्या लेखणींत आहे ?

मधला एक काळ असा गेला की 'तंत्र' या शब्दाचा उल्लेख केल्याशिवाय कोणताच टीकाकार आपला टीकालेख लिहीत नसे. रशियन वाङ्मयकारांनी कलेच्या क्षेत्रांत जे निरनिराळे प्रयोग केले त्यांच्या इतिहासाच्या अल्पशा परिचयाच्या आधारावर या 'तंत्र' शब्दाचा बडिवार मिरवला जात होता. पण असा बडिवार मिरवतांना रशियन वाङ्मयकार स्वतंत्र होते. परंपरेवर कुठाराघात करून नवे तंत्र निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते हे सत्य जन्मजात परंपराप्रिय असलेल्या आमच्या आजच्या टीकाकारांना जाणवत नव्हते. आज स्वतंत्रतेचा बडिवार मिरवताना पारतंत्र्याच्या लेखणीचा उपयोग केला जात आहे एवढे खरे. तो स्वतंत्रता येण्याचा काल अजून आलेला नाही. ती स्वातंत्र्याची ज्वलज्जहाल वृत्ती अजून आमच्या अंगी बाणलेली नाही. स्वातंत्र्याचा जिथे मुळी अनुभवच नाही तिथे नवीन तंत्राची नवी भूमिका निर्माण करणे किती दुर्धर आहे हे ज्यांनी तसे प्रयत्न केले आहेत त्यांनाच सांगता येईल. नवे वाङ्मय निर्माण झाले की त्याच्या कसोटीसाठी परदेशी वाङ्मयाचा बाहुटा दाखविण्याची गुलामी मनोवृत्ती टीकाकारांच्या ठायी जागी होऊ लागते याचे कारण त्या अनुभवांचा अभाव.

नायक – नायिका, उपनायक – उपनायिका, खलपुरुष, कथानक, उपकथानक, गंभीर प्रवेश - विनोदी प्रवेश वगैरे जुनी परिभाषा वापरण्याची आमची सवय अजून सुटलेली नाही. तरीही तंत्राची कसोटी लावून टीका करण्याचा आव मात्र आणला जात आहे.

प्रस्तुत नाटक आधी दोन अंकी आहे. त्या अंकाला मी 'प्रकरण' असे संबोधन दिले आहे. कारण ही दोन्ही प्रकरणे नाट्यवस्तूच्या दृष्टीने परस्परांशी जितकी संलग्न आहेत तितकीच वेगवेगळी आहेत. इतर नाटकांप्रमाणेच या नाटकात प्रधान व्यक्तींना प्राधान्य नाही. प्रधान नसणाऱ्या इतर व्यक्ती दोन्ही

प्रकरणांत सारख्या असल्यातरी व्यक्तिनिष्ठता टाळून. ‘ वस्तूला ’ या नाटकात— जुन्यापरंपरेच्या भाषेत बोलायचे म्हणजे — नायकाचे स्थान दिलेले आहे. नित्याचे पारंपारिक तंत्र न दिसल्यामुळे जुन्या परंपरेच्या भोक्त्यांना या नाटकामुळे ठसका लागेल हे मला माहीत असले तरी, निर्मात्यांची तयारी असल्यामुळे हा नवा प्रयोग करून पहाण्याचे धाडस या नाटकाच्या द्वारे मी केले आहे.

प्रस्तुत नाटकांतील घटना वास्तव स्वरूपाच्या असल्या तरी त्यांतील व्यक्ती आणि नाट्यप्रसंग पूर्णपणे काल्पनिक आहेत म्हणूनच कुठेतरी सादृश्याचा भास झाला म्हणून कुणी उगीच गैरसमज करून घेऊ नये.

१९४१ च्या सप्टेंबर महिन्यात होऊ घातलेल्या अखिल भारतीय लेखक संघाच्या, मुंबई येथे अपेक्षिलेल्या अधिवेशनाच्या वेळी करण्याकरीता हे नाटक त्यापूर्वी सुमारे दोन महिने लिहिले गेले होते. पण ते अधिवेशन मुंबई येथे भरले नाही. परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे दिल्ली येथे त्या अधिवेशनाची कशीबशी संपादणी करण्यात आली. १९३८ साली श्री. आळतेकर यांनी सुरू केलेल्या नॅशनल थिएटर ॲकेडमीच्या विद्यमाने होणाऱ्या नाटकाच्या मालिकेत हे नाटक रंगभूमीवर आणण्याचे त्याच वेळी ठरले होते. त्याचा प्रयोग होण्याचा सुयोग आता येत आहे. तंत्रदृष्ट्या पारंपारिकतेला हाणून नव्या तंत्राचे नवे प्रयोग करण्याची कित्येक वर्षांपासूनची इच्छा होती. व्यवसायाचा पसारा न मांडता श्री पार्श्वनाथ आळतेकर यांनी हे प्रयोग करण्याची सुरवात केली म्हणूनच त्यांच्या या प्रयोगशाळेत सहकार्य करण्याचे भाग्य मला लाभले.

गेला सातआठ वर्षांचा काल महाराष्ट्राच्या दुर्दैवाने रंगभूमीच्या अंधार-युगाचा होता. या मधल्या काळात प्रेक्षकांच्या नाट्यदृष्टीत काहीतरी उणीव उत्पन्न झाली आहे असा संशय क्षणभर आल्यावाचून रहात नाही. ज्या या मुंबईत एकाच वेळी तीन चार नाट्यसंस्थांची नाटके सारखी झडत रहात होती तिथेच नाटक पहाण्याचा योग आज कपिलाषष्ठीचा होऊन बसला आहे. म्हणूनच प्रेक्षकांची मोडलेली सवय पुन्हा जागती करण्याचे होणारे सर्व प्रयत्न उच्च भूमिकेवरून व्हावे अशी अपेक्षा रंगभूमीचा एक जुना पाईक या नात्याने मी केली तर ती आशाळभूतपणाची ठरणार नाही अशी माझी खात्री आहे.

हाजी कासमवाडी
मुंबई १८–१०–४२

**भा. वि. वरेरकर**

या नाटकाचा पहिला प्रयोग लिट्‌ल् थिएटरच्या विद्यमाने 'नॅशनल थिएटर अॅकडमी' च्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी दिनांक १ नोव्हेंबर १९४२ रोजी रॉयल ऑपेरा हाऊस, मुंबई येथे सादर केला.

संगीत : श्री. नवरंग

आर्केस्ट्रा : श्री. देवधर

नेपथ्य : बाळ कृष्ण राजे

**कलावंत**

भाऊसाहेब : पार्श्वनाथ आळतेकर

बाबासाहेब : पार्श्वनाथ आळतेकर

सुमित्रा : सुशीला लोटलीकर

सुलभा : कल्याणी नायमपल्ली

सुषमा : कांचनमाला शिरोडकर

राजाभाऊ : रामचंद्र वर्दे

प्रभाकर : शंकर ओक

गोपाळराव : त्रिंबक गोखले

कमलेश : गणेश चौधरी

बाळासाहेब : वसंत गवाणकर

# प्रकरण पहिले

## चढती पायरी

मुंबईच्या दादर विभागातील एका प्रशस्त ब्लॉकमधला दिवाणखाना. दिवाणखान्याच्या उजव्या बाजूला बाहेरून आत येण्याचा दरवाजा. दोन्ही बाजूंला आतल्या खोलीत जाण्याचे दोन दरवाजे. दिवाणखान्याबाहेर पॅसेज असून त्याच्या पलीकडे दुसरा ब्लॉक असावा. त्या पॅसेजमधून येणारी माणसे खिडकीतून दिसतात. दिवाणखान्यात अगदी आधुनिक पद्धतीचे भरगच्च फर्निचर आहे. भिंतीजवळ आधुनिक तऱ्हेचे लिहिण्याचे टेबल आणि त्याच्यासमोर फिरती खुर्ची आहे. मध्यभागी सोफासेट, आजूबाजूला लहान-मोठ्या खुर्च्या आणि टीपॉय आहे. प्रत्येक टीपॉयवर आणि लिहिण्याच्या टेबलावर ॲश-ट्रे आहे. पडदा वर जातो तेव्हा सुमित्रा सोफावर बसलेली असते. तिच्या आजूबाजूला पडलेली मासिके उगीच उघडून त्रासिकपणे फेकून देत असते. इतक्यात बाहेरून प्रभाकर येतो. दाराजवळ उभा राहून दारावरची बेल वाजवितो. सुमित्रा नुसती हसते. मागे वळूनसुद्धा पाहात नाही. प्रभाकर आत येतो.

**प्रभाकर :** काय हे सुमित्राबाई, सारखी बेल वाजवीत होतो पण नुसतं उत्तर

सुद्धा दिलं नाही तुम्ही !

**सुमित्रा** : [ त्याच्याकडे न पाहता ] दार उघडं होतं !

**प्रभाकर** : पण शिष्टाचार आहे ना ?

**सुमित्रा** : मग थांबायचं होतं मी उत्तर देईपर्यंत. शिष्टाचार म्हणे ! मग आता कसे आत आलात ?

**प्रभाकर** : चुकलं खरं.

**सुमित्रा** : मग जा पाहू आता. सारं खोडून टाका तांबड्या शाईनं. तुम्ही आला नाहीत—बोलला नाहीत—मी काही ऐकलं नाही—अन काही सांगितलंही नाही तुम्हांला.

**प्रभाकर** : जसा हुकूम.

[ प्रभाकर बाहेर जातो आणि पुन्हा बेल वाजवतो. ]

**सुमित्रा** : कोण आहे ?

**प्रभाकर** : ( दारातून ) मी तो.

**सुमित्रा** : कोण मी तो ?

**प्रभाकर** : सुमित्राबाईंच्या पतिराजांचा एक नम्र शिष्य.

**सुमित्रा** : शिष्योत्तमा, तुझ्या गुरुगृहाचा दरवाजा तुला केव्हाही खुलाच आहे.

[ प्रभाकर ' वा, वा ' म्हणत मोठमोठ्याने हसत आत येतो. सुमित्राही हसू लागते. हसण्याच्या उकळ्यावर उकळ्या येत तो एका खुर्चीत बसतो. ]

**सुमित्रा** : [ एकदम गंभीर होऊन ] काय झालं एवढं हसायला ?

**प्रभाकर** : केवढी आहे ही सहवासाची महती ? भाऊसाहेबांची विनोदबुद्धी अगदी तंतोतंत उतरली आहे आपल्या ठायी. पुष्पसंगे मातीस वास लागे--

**सुमित्रा** : मातीस का ? हे पुष्प कोण नी ही माती कुठली ?

**प्रभाकर** : हे पाहा, असा अगदी शब्दशः अर्थ घ्यायचा नाही. उपमा नुसती अलंकारापुरती असते. ' सहवासेन तु कौन्तेय ' असं काहीतरी गीतेत म्हटलं आहे ना—

**सुमित्रा** : पुरे झाली तुमची उपमा नी पुरे झाली ती गीता. गीता म्हटली की चीड येते नुसती मला. गीता म्हणे गीता. कधी वाचली होती गीता ? कधी पाहिली होती ?

**प्रभाकर :** कशाला वाचायला हवी ? भाऊसाहेबांच्या तोंडचं एकेक वाक्य म्हणजे भगवद्वाक्य होय. त्यांच्या तोंडचं ऐकूनच आम्ही कितीतरी शिकलो आहोत. म्हणूनच मी म्हटलं—

**सुमित्रा :** पुष्पसंगे मातीस वास लागे ?

**प्रभाकर :** ते जाऊ द्या, आता केव्हा येणार आहेत भाऊसाहेब ?

**सुमित्रा :** ते कधी कुणाला सांगता आलंय का आजवर ?

**प्रभाकर :** तेही खरंच. किती व्याप आहेत त्यांच्यामागं. कशा एवढ्या उलाढाली करतात याचंच आश्चर्य वाटतं आम्हांला. ती पुस्तकं तर आहेतच —तिकडं ते राजकारण—असेंब्लीच्या बैठका आहेतच—शिवाय ते बोलपट–सहा कंपन्यांना एकावेळी कथा दिल्या आहेत ना ?—

**सुमित्रा :** सहा नव्हे. पाच.

**प्रभाकर :** बरं बरं पाच. पाच काय, सहा काय, एकूण एकच. शिवाय व्याख्यानं सुरू आहेतच–शिवाय ते स्वतःचं वर्तमानपत्र—शिवाय दुसऱ्या वर्तमानपत्रांसाठी लेख लिहायची झुंबड आहेच मागं. हद्द आहे त्यांच्यापुढं. हे एवढं चाललं आहे तरी कसं याचंच आश्चर्य वाटतं आम्हांला. शिवाय तुम्ही —( थांबतो )

**सुमित्रा :** मी काय ?

**प्रभाकर :** नाही म्हटलं प्रेमानं ओथंबलेली एवढी कथानकं लिहिताना तुमच्याकडे काही अगदीच दुर्लक्ष करीत नसतील ?

**सुमित्रा :** नि केलं म्हणून काय बिघडलं ? मी वाचतेच आहे की ती सारी पुस्तकं.

**प्रभाकर :** शिवाय या भेटी आणि मुलाखती—

**सुमित्रा :** आज मुलाखत घ्यायची आहे वाटतं ?

**प्रभाकर :** तुम्हांला कसं कळलं !

**सुमित्रा :** पुष्पसंगे मातीस वास लागे !

**प्रभाकर :** मला वाटतं, भाऊसाहेबांची मुलाखत घेण्यापेक्षा—( थांबतो. )

**सुमित्रा :** माझी मुलाखत घ्यायची म्हणता ? माझी मुलाखत घ्यायची तर ती कुणी तरी माझ्यासारखीनंच घेतली पाहिजे. बायकांचं हृद्गत पुरुषांना कळत

नसतं.

**प्रभाकर** : पण आम्हा लेखकांना ?

**सुमित्रा** : ती पुस्तकं वाचा ना एक एक. त्यात कळून येतेच की एकेकाची अक्कल. नावं स्त्रियांची असतात म्हणून स्त्रिया म्हणायच्या एवढंच. पूर्वीच्या नाटकांतल्या स्त्रीपार्टयांसारख्या असतात या स्त्रिया. नाव स्त्रीचं पण वाणी पुरुषाची—

**प्रभाकर** : अन् भाऊसाहेबांच्या बुकांत ?—

**सुमित्रा** : ही मुलाखतीची नांदी वाटतं ? तशी नाही बरं मी शब्दांत सापडायची. मी आपली सरसकट बोलतेय. माझी मुलाखत तुम्हांला हवी असली तर कुणीतरी बाई पाठवा मुलाखत घ्यायला. तुमची—

**प्रभाकर** : अजून माझं लग्न नाही झालं हो.

**सुमित्रा** : बायको असं कुठं म्हटलं मी ? कुणी अशी प्रेमातली असली — असायचीच अशी कुणीतरी म्हणा—हसू नका, आमची लग्नं तरी ही अशीच झाली ना—तेव्हा आम्हांला ते सारं माहीत आहे. तशी कुणी असली तर तिला पाठवा. समजलं ?

**प्रभाकर** : आता कुणाला पाठवू ?

**सुमित्रा** : म्हणजे अशा आहेत तरी किती ?

**प्रभाकर** : [ हसत ] मोठ्या चाणाक्ष आहात बुवा तुम्ही. पण मला मुलाखत द्यायची नाही असं अगदी ठरलंच आहे का तुमचं ? [ घंटा वाजते. ] आता कोण आलं आणखी ?

**सुमित्रा** : पाहा ना !

[ प्रभाकर उठून दरवाजा उघडतो. भाऊसाहेब येतात. ]

**प्रभाकर** : वा:, तुम्हांला सुद्धा घंटा वाजवावी लागते वाटतं ?

[ भाऊसाहेबांचा पोषाख अगदी आजतागायत आहे. ' टेलर मेक्स दी मॅन ' अशी जी म्हण आहे ती त्यांच्याबाबतीत सार्थ वाटते. त्यांच्या तोंडात सिगारेट सारखी तेवत असते. त्यांचे वय पस्तीस आणि चाळीसच्या दरम्यान असावे. त्यांच्या वयाच्या मानाने त्यांची बायको सुमित्रा बरीच लहान दिसते. ]

**भाऊसाहेब** : शिस्त म्हणजे शिस्त. मीच शिस्त मोडू लागलो तर दुसरे माझं

कसं ऐकतील ? तू कुठं आला होतास इकडे ?— [ बोलत बोलत ते आत जातात. उत्तर कुणाला द्यावं हा विचार करीत प्रभाकर क्षणभर पाहात राहून सुमित्रेकडे येतो. सुमित्रा तशीच बसून राहिली आहे. ]

**सुमित्रा :** आता कळलं ? म्हणून मघाशी तुम्हांला परत जावं लागलं ते.

**प्रभाकर :** आम्ही वर्तमानपत्रे लोक—गबाळेपणा म्हणजे आमचं ब्रीद —आम्हांला कसं हे कळावं ? शिकेन आता हळूहळू. हाच किता गिरवायचा आहे ना मला ? [ सुमित्रा हसते ] हसू नका. कुठलं तरी ध्येय पुढं ठेवल्याशिवाय—नव्हे कुणाचं तरी ध्येय पुढं ठेवल्याशिवाय माणसाला लेखन करता येत नाही. म्हणून आम्ही—[ कोट काढून ठेवून भाऊसाहेब येतात. ]

**भाऊसाहेब :** विचारल्या प्रश्नाचं उत्तरसुद्धा देता येत नाही वाटतं ? आमच्या तरुणांचं चुकतं ते इथंच—हं. थांबा, काय सांगणार आहेस ते मला माहीत आहे. मी आत गेलो तेव्हा उत्तर कुणाला द्यायचं ?—होय ना ? चट्कन उत्तर दिलं असतंस तर नसतं का ऐकू आलं मला ? प्रश्नासरशी उत्तर आलं पाहिजे. अगदी खोळ बसली पाहिजे प्रश्नोत्तरांची. कसं रे तुम्ही लिहिणार ? नित्याच्या व्यवहारात जेव्हा हे साधेल तेव्हा ते येईल ना लेखनात ? डोळे उघडून पाहिलं पाहिजे—कान उघडून ऐकलं पाहिजे अन् सारं साठवून ठेवलं पाहिजे हृदयात. ती हृदयाची झरणी झरू लागली अन् मूळ साठ्यातच काही नसलं तर लेखणीच्या टोकाला येणार काय ? लढाईतला टेहळ्या आणि वाङ्मयातला लेखक हे दोघेही सारखेच. वर्मावर दृष्टी ठेवली पाहिजे. वर्म शोधून काढून मारा केला पाहिजे तेव्हा कुठं चुकून एखादा वार लागतो.—हं थांब—तू काय म्हणणार ते माहीत आहे मला. व्हॉलंटियर आणि लढवय्या यांच्यातला जो फरक तोच तुझ्या माझ्यातला फरक. दोघेही हत्यारं वापरतात. पण काय होतं दोघांच्या बाबतीत ? एक चाचपडत असतो, दुसरा अचूक वार करतो. वार लागला तर एक खचतो, तर दुसरा सत्याऐशी वार सहन करून शत्रूचं मुंडकं छाटतो. नवशिक्या आणि कसलेल्या लेखकांतला फरक आहे तो हाच. अजून बच्चा आहेस प्रभाकर—हं, हं समजलो—तू म्हणशील, तसं आपल्या वयांत फारसं अंतर नाही. पण कारकीर्दीत अंतर आहे. तू नुकता कुठं आखाड्यात उतरतोयस. या धकाधकीच्या मामल्यात कित्येक वर्षे मी

मैदान मारून बसलो आहे. वर्तमानपत्रात चार लेख खरडले की आपण कुणीतरी मोठे लेखक झालो, असं वाटत असतं तुम्हा लोकांना. पण कचरा आहे तो—रद्दीबरोबर जाणार वाण्याच्या दुकानात. ते असले लेख गोळा करून पुस्तकं छापून काढलीत तरी त्यांची किंमत त्या रद्दीइतकीच. काय रे creative work केलं आहे तुम्ही ?—

**प्रभाकर :** [ सारखा मधे बोलण्याचा प्रयत्न करीत असता भाऊसाहेबांचा दम जरा थांबल्याची संधी साधून ] करू की आम्ही काही तरी. पण लोक कुठं वाचताहेत तुमचं creative work ? आधी वाचतात ती आमची टीका—आमची परीक्षणं—अन् मग घेतात तुमची पुस्तकं हातात.

**सुमित्रा :** शेवटी बोललात म्हणायचे !

**भाऊसाहेब :** तो काय बोलतो ? मीच संधी दिली त्याला बोलायला. काय रे वाटतं तुला ? तुझी परीक्षणं वाचताहेत असं वाटतं ? किती जणांवर कोरडे ओढलेयस आजपर्यंत ? त्या बाबासाहेबाची थोडी का निंदा केलीस ? पण त्याच्या पुस्तकांचा खप काही कमी झालाय का ?

**प्रभाकर :** आता हे तुम्हीच म्हणता ? तुम्हीच सांगितलं ना ? म्हणूनच ना लिहिलं मी ?

**भाऊसाहेब :** मी पुष्कळ सांगितलं—पण तू लिहिलंस ! का लिहिलंस ? तुला पटत होतं म्हणून ना लिहिलंस ? नुसतं मी म्हणतो म्हणून नाही ना लिहिलंस ? अरे, माझंच ऐकता आणि नंतर तुम्ही लिहिता—ते माझेच शब्द वापरता अन श्रेय तुम्हांला हवं का रे लेको ? दुसऱ्याच्या जिवावर मोठेपणा मिळवायचा अन् मग स्वतःच्या नावावर शेखी मिरवायची. तुम्ही वर्तमानपत्रे हे असेच.

**सुमित्रा :** केवढ्याशा गोष्टीवर केवढा गहजब हा ! नुसतं उत्तर दिलं नाही त्यांनी, तिथं एवढं हे व्याख्यान कशाला द्यायला हवं होतं ?

**भाऊसाहेब :** का ? आता आपल्याला आला वाटतं कढ ? व्याख्यान ऐकायला हवं वाटतं माझं ? लेख द्यायचा कबूल केलायस वाटतं याला ? बरा मिळालोय मी भांडवलवाला. चांगला exploit करताहात मला चोहोबाजूंनी.

**प्रभाकर :** हं हं ! हे मात्र मी ऐकून घ्यायचा नाही. भांडवलवाल्याला कुणी

exploit करीत नाही. दुसऱ्यांना exploit करतात ते भांडवलवाले. मार्क्सनं सांगितलंय—

**भाऊसाहेब :** मार्क्स राहू दे ! आधी मी काय सांगतो ते ऐक. आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. कशाला आला होतास आज ?

**प्रभाकर :** तसं कारण निराळं होतं. पण आधी या भेटल्या, तेव्हा म्हटलं यांची मुलाखत घ्यावी—

**भाऊसाहेब :** तिची मुलाखत घेणार तू! कशाला रे ? माझी खाजगी बिंगं काढून चव्हाट्यावर मांडायची आहेत वाटतं ? माझ्या तालमीत तयार झालीय ती. ती अशी फसायची नाही तुझ्यासारख्या बावळटाला.

**प्रभाकर :** असं झालं खरं.

**भाऊसाहेब :** होय ना ? मग आता कोणत्या कामाला आला होतास ते सांगून टाक पाहू.

**प्रभाकर :** तेच आपलं काम. दुसरं काय असायचं ? तेवढंच एक काम हाती घेऊन बसलोय. आपली मेजॉरिटी होणार यात अगदी शंकाच नाही आता. इतक्यात मतमोजणी सुरू झाली असेल. जे काही करायचं ते काल रात्रीच करून ठेवलंय. ओला ब्लॉटिंग पेपर लावून सारी कव्हरं काल रात्री आम्ही उघडून पाहिली—

**भाऊसाहेब :** गाढव आहेस. ते इथं सुद्धा सांगायचं नाही.

**सुमित्रा :** मी सांगेन वाटतं कुणाला ?

**भाऊसाहेब :** हो, सांगशील. बढाई मारण्यासाठी सांगशील—हं, हं, थांब—नाही सांगणार तू असं धरून चालतो. पण एकदा वाचा फुटली की शेषाच्या जिभांनी विषार फैलावत जाईल ना चोहीकडे ? हा देखील जाईल बढाई मारायला नि अचूक त्या कमलेशकडेच बोलेल—अन् तो जाऊन सांगेल त्या म्हाताऱ्या बाबासाहेबाला. तसं तो काही बोलायचा नाही म्हणा. तो कुठं कुणाची पर्वा करतोय. तसं पाहिलं तर धडपडतो आहोत आम्हीच. तो ' तान में मस्तान ' स्वस्थ बसून राहिलाय अजगरासारखा. म्हणूनच ना एवढा म्हातारा झाला तरी अध्यक्षपद मिळवता आलं नाही त्याला ? तसं पाहिलं तर या अध्यक्षपदाची काय किंमत आहे ? तीन दिवस बसायचं खुर्चीवर अन् चौथ्या दिवशी विसरून

जायचं. [ सुमित्रा हसते. ] हसू नकोस. अगदी अक्षरशः खरं आहे ते. पण मला ते दाखवून द्यायचं आहे—सारखं वर्षभर गाजवीत राहणार आहे मी. तेवढ्यासाठी आणखी एक वर्तमानपत्र काढायचा देखील घाट मी जमवून ठेवलाय. आतापर्यंतचे अध्यक्ष चौथ्या दिवशी fade out झाले. आता माझ्यामागून चार अध्यक्ष आले तरी माझा विसर पडू द्यायचा नाही मी. हा व्यवहार आहे. एवढंसं बाजूला सरकलं तर दुसराच कुणीतरी मधे घुसून कोपरखळी मारतो. त्या तेवढ्याशा कोपरखळीनं आजवरचे अध्यक्ष एकदम बाजूला पडले. या असल्या कोपरखळ्याच काय, पण हजार गुद्दे मारले तरी कसा ताडासारखा ताठ उभा राहतो ते दाखवून द्यायचंय मला.

**सुमित्रा** : चहा झालाय वाटतं बाहेर ?

**प्रभाकर** : त्यांचा झाला असेल पण आपल्याला हवाय बुवा चहा. सारी रात्र जागरण झालंय काल. तिथं सांगितलं त्यांना, एवढं हे काम करायचं तर चहाची तरी तयारी ठेवा. पण सारेच दरिद्री. एकाच्या खिशात दमड्या असतील तर शपथ. तो कालचा सगळा चहा शिल्लक राहिला आहे—

**सुमित्रा** : तो इथं वसूल करणार आहात वाटतं ?

**भाऊसाहेब** : मला का सांगितलं नाहीस ? मी केली असती तजवीज. तुम्ही लोक माझं काम करीत होता हे विसरण्याइतका काही मी कृतघ्न नाही. अग, चहा ठेव ना त्याच्यासाठी थोडा —थोडा का, चांगला चार कप चहा दे त्याला.

**प्रभाकर** : माझी आंघोळ झाली आहे.

**भाऊसाहेब** : अरे वा ! आता ‘ विटा ’ पाडू लागलास तू. केव्हा हा रोग उद्भवला ? असल्या भानगडीत पडू नकोस बरं. कुणाची तरी शिळी कोटी घेऊन त्याच्यावर अशी भूक भागवून घेऊ लागलास तर शिळ्या रोटीवर भूक भागवणाऱ्या भिकाऱ्याच्या पंक्तीला बसावं लागेल तुला. ( सुमित्रेला ) ऊठ ना आता.

**सुमित्रा** : बेजार झालेय या तुमच्या चहाच्या पायी. या तुमच्या मोठेपणाच्या पायी हाडं खिळखिळी होतायत माझी.

**भाऊसाहेब** : पण मिरवायला मिळतंय ना बड्या लेखकाची बायको म्हणून ?

ओ म्हणता ठो कळत नसलं तरी स रे भगिनीसमाज अध्यक्ष म्हणून बोलावताहेत ना तुला? त्याचा मोबदला नको वाटतं? [ तो बोलत असताना सुमित्रा निघून आत जाते. ] आता तू खबरदारी घे प्रभाकर. एखादी लेखिकाच शोधून काढ कुणी तरी—नाही तर एखादी नटी, एखादी गाणारी किंवा नाचणारी अशी कुणीतरी शोधून काढ—

**प्रभाकर :** कशाला? तिच्या नावावर विकायला? ती पाहिलीयत वैभवं मी. अगदी अक्षरशत्रू बायको शोधून काढणार आहे मी. मला स्वैपाकीण पाहिजे—मालकीण नकोय. तिनं मिळवायचे शेकडा हजारांनी नि मी दमडी दुगाणीला महाग असायचा! नको रे बुवा! त्यापेक्षा कुणी खेडवळ, सनातनी, कोपरभर चोळी घालणारी, ओचे खोवून इल्कली लुगडं नेसणारी, खेड्यातली मंगळाई असली तरी चालेल. निदान कुणी पाहायचा तरी नाही तिच्याकडे मग. नाहीतर आमच्याऐवजी तिच्याच पायी गर्दी व्हायची आमच्या घरी. अन् मग तिच्या पाहुण्यांसाठी चहा करावा लागायचा आम्हांला. तसं पाहिलं भाऊसाहेब, तर हे तुमचंसुद्धा चुकलंयच जरासं—

**भाऊसाहेब :** ते तू शिकवायला नकोस मला. माझी कर्मं निस्तारायची धमक चांगली आहे माझ्या अंगी. सांगून सवरून खेळवतो आहे एकेकाला. नाहीतर कशाला रे तुम्ही ओले ब्लॉटिंगपेपर घेऊन जागत बसला असता? काय मी देऊ केलं होतं तुम्हांला काही?—की उद्या अध्यक्ष झालो की तुम्हांला कुठं नोकरी द्यायचा अधिकार येणार आहे मला? नाचताच आहा की नाही सारेजण! तुम्हांला वाटतं की तुम्ही खेळवता आहात मला म्हणून—हं!—असं आहे जग हे. जो पाहावा तो चलत्या गाडीखालचा कुत्रा. पुढं कुठला बैल केवढ्या ताकदीनं गाडी ओढतो आहे ते कुठं कळत असतं त्या कुत्र्याला? ती गाडी थांबली, की तो कुत्रासुद्धा थांबतो. अन् म्हणतो, आपण थांबलो म्हणून गाडी थांबली. तिकडे रवंथ थांबला बैलाचा, की तो गाडी ओढू लागतो. अन् मग तो कुत्राही चालू लागतो. राजकारण काय की वाङ्मय काय, दोघांचेही मार्ग सारखेच. हे असं चाललंय जिकडे तिकडे!—का रे, तोंडसं वाईट केलंस? कुत्रा म्हटलं म्हणून प्रामाणिकपणाचा अभिमान नाही का तुला? खरी श्रद्धा, खरी निष्ठा, कुठं पाहायची असेल तर कुत्र्याच्या जातीकडे पाहा. वाघ

सिंह म्हणण्यापेक्षा इमानी कुत्र्याचीच उपमा जास्त आवडली पाहिजे तुझ्यासारख्याला. हल्ली ईमान अगदी दुर्मिळ झालंय या जगात. म्हणूनच इमानी माणसं पाहिली, की मला कुत्र्याची आठवण होते. असेच वागलो होतो आम्ही आमच्या काळात. दुसऱ्यासाठी झिजलो होतो. म्हणूनच ना तुझ्यासारखे चार तरणेबांड आज धावून पुढं येताहेत ?

**प्रभाकर :** पण मी असं कुठं म्हटलंय ? तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत. तुम्ही आहात म्हणूनच ही सेवा करायची संधी आम्हांला मिळतेय !—अजून चहा झाला नाही वाटतं ? गॅसस्टोव्हर सुद्धा का इतका उशीर लागतो चहाला ?

**भाऊसाहेब :** साऱ्या दिवसात चहा मिळाला नव्हता का तुला ?

**प्रभाकर :** कसा मिळायचा ? एक आणा तरी टिंचवायला हवा ना त्या इराण्याकडे ?

**भाऊसाहेब :** एवढा पगार मिळतो त्याचं करतोस काय ?

**प्रभाकर :** मिळतो म्हणून कुणी सांगितलं ? एवढा पगार नुसता ठरला आहे. तो मिळणं काही आमच्या हाती नाही. तीनचार महिन्यांपूर्वी काही तरी मिळालं होतंसं आठवतं. खोलीचं भाडंसुद्धा दिलं नाही गेल्या तीन महिन्यांत.

**भाऊसाहेब :** पण तुझं वर्तमानपत्र मोठ्या झोकात चाललंय म्हणतात ?

**प्रभाकर :** हो झोकात चाललंय. पण तो सारा झोक जातोय मालकांच्या पोतडीत. म्हणूनच तुमचं ते भांडवलवाल्याचं उदाहरण मला पटलं नाही. कशाला हव्यात त्या गोष्टी ?—

**भाऊसाहेब :** ( पाटलोणीच्या खिशातून पाकीट काढून त्यातली एक नोट त्याच्या खिशात टाकीत ) राहू दे एवढं तूर्त. किरकोळ खर्चाला होईल तुला

[ बेल वाजते. प्रभाकर दरवाज्याकडे जातो. दरवाजा थोडासा उघडून पाहून बंद करतो आणि परत भाऊसाहेबांकडे येतो ]

**प्रभाकर :** ( हळूच ) गोप्या आलाय !

**भाऊसाहेब :** येऊ दे त्याला.

[ प्रभाकर तोंड वाकडे करून जातो आणि दार उघडतो. ]

**प्रभाकर :** ( दाराजवळच ) या गोपाळराव, भाऊसाहेब तुमचीच वाट पाहात होते.

**गोपाळराव :** ( आत येत येत ) हळूच दार उघडून पाहिलंस ते मला दिसलं नाही वाटतं. [ भाऊसाहेबांजवळ येऊन बसत ] बरं का भाऊसाहेब, आज तीन महिने झाले. दहा रुपये ॲडव्हान्स दिले आहेत यांना. पण अजून काही पुस्तक मिळत नाही यांच्याकडून. मी तगादा लावला, तेव्हा वर्तमानपत्रातली ही एवढी कात्रणं काढून यांनी माझ्या अंगावर टाकली. हा काय व्यवहार झाला ? आणि नावदेखील तेच. नावाचा अन् मजकुराचा मेळ तरी बसला पाहिजे ना ? गिऱ्हाईक माझ्या तोंडात शेण नाही का घालायचे !

**भाऊसाहेब :** घालतील, घालतील. अवश्य घालतील. अजून का घातलं नाही याचंच आश्चर्य वाटतंय मला. दहाच रुपये ना ?—

**गोपाळराव :** दहा म्हणजे काय थोडे झाले ? १६० आणे. ६४० पैसे.

**प्रभाकर :** १९२० पया. अन् कवड्या किती ? ती कोष्टकं विसरलो आता. बरं का भाऊसाहेब, दहा फॉर्मोच्या पुस्तकाला वीस रुपये ठरवले. म्हणजे पानी किती बरं ? दोन आणे पडतात. नक्कल करणाऱ्याची मजुरी तरी होईल का ती ? घ्यायला लाज वाटली नाही,—गरजू आहो ना आम्ही ?—पण द्यायला यांना लाज वाटायला नको का ?

**गोपाळराव :** व्यवहारात कसली लाज ? निर्लज्जपणाशिवाय व्यवहार होत नसतो. पुस्तक छापायलाच गेले असते चारशे. शिवाय माझं पुस्तक म्हणजे झक निघालं पाहिजे. जॅकेटचं डिझाईन काढायलाच जातील वीस रुपये—

**प्रभाकर :** म्हणजे एक पानाला ?

**गोपाळराव :** हो, हो, एक पान. पण तो आर्टिस्ट असतो, लेखक नव्हे. चित्र असतं ते, रेघोट्या नव्हेत—

**प्रभाकर :** चुकलंच ते. आर्टिस्ट तरी झालो असतो—

**भाऊसाहेब :** बरं, बरं, ते राहू दे. ते आहे तसं पुस्तक घेऊन टाक. अन त्याचे दहा रुपये आधी दे पाहू माझ्यासमोर.

**गोपाळराव :** तुम्ही म्हणता म्हणून—

**भाऊसाहेब :** हो, हो. मी म्हणतो म्हणून.

**गोपाळराव :** नाहीतर एक दमडीसुद्धा दिली नसती. उलट फिर्याद लावली असती त्या दहा रुपयांसाठी. बेहत्तर आहे कोर्टाला पैसे गेले तरी. पण चांगली

खोडकी मोडली पाहिजे तुम्हा लेखकांची.

**भाऊसाहेब** : प्रकाशकाचा धंदा आहे तुझा गोप्या—अन् मीही लेखकच आहे. माझी खोडकी मोडणार आहेस ?

**गोपाळराव** : तुमची गोष्ट वेगळी, यांची गोष्ट वेगळी. तुमचं पुस्तक प्रसिद्ध होतंय असं कळायची खोटी, की आधी ऑर्डरी येऊन पडता बुकसेलरकडून ! अन् त्या ऑर्डरीबरोबर यांच्यासारख्याचं एकेक पुस्तक देतो पाठवून म्हणून परत येत नाही ते—एवढंच.

**भाऊसाहेब** : [ आतल्या दरवाजाकडे पाहून ] आणखी एक चहा हवा अं.

**सुमित्रा** : [ चहाची ट्रे घेऊन बाहेर येत ] गोपाळरावांचा आवाज ऐकला तेव्हाच कळलं होतं भविष्य मला. हॉटेलातली वेटरच की नाही मी—
[ एकेकाच्या पुढे ट्रे करीत ] काही ‘ शिलव्हरी ’ तरी ! नुसते पेले उचलताहेत. मी दारात दिसले ट्रे घेऊन येताना, तर पुढं येऊन घ्यायची तरी ती ट्रे !

**प्रभाकर** : मी येणार होतो वैनी. पण माझं डोकं नव्हतं ठिकाणावर. यांनी माझे वाभाडे काढायला सुरुवात केली होती—
[ तिघेही चहा घेत घेत बोलत असतात. ]

**भाऊसाहेब** : आता असं पाहा गोप्या, याच्या त्या कादंबरीच्या किती प्रती काढल्या होत्यास ?

**गोपाळराव** : हजार.

**भाऊसाहेब** : त्यातल्या किती खपल्या ?

**गोपाळराव** : एक वर्ष झालं पण अजून तीनशेसुद्धा खपल्या नाहीत.

**भाऊसाहेब** : मग तो रामदास बुक डेपोचा माणूस गेला होता त्याला एकसुद्धा कॉपी शिल्लक नाही म्हणून कसं सांगितलंस ?

**गोपाळराव** : [ एकदम घटाघट चहा पिऊन पेला खाली ठेवीत ] आता दोनशे कॉपी तुमच्यासमोर आणून हजर करतो.

**भाऊसाहेब** : अन् बाकीच्या पाचशे ?

**गोपाळराव** : त्या वाटून टाकल्यायेत एकेका बुकसेलरकडे. पण पैसे आले नाहीत अजून त्याचे.

भाऊसाहेब : कुणाला सांगतोस हे ? कुणाच्याही पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघू नये म्हणून दोनशे प्रती अडकवून ठेवायची तुझी पद्धत मला माहीत नाही असं तुला वाटलं गोप्या ? माझ्याकडेसुद्धा एकदा तसा डाव खेळला होतास. पण एक बुकसेलर निघाला अन् त्यानं त्या दोनशे कॉप्या ओकवल्या तुझ्याकडून. आठवतं का ते ?

गोपाळराव : हा व्यवहार आहे भाऊसाहेब. व्यवहारात हे असं चालायचंच.

भाऊसाहेब : याच्यासारखा लाचार माणूस मिळाला म्हणून असं अडवतोयस.

गोपाळराव : पण तुम्हांला कुठं अडवतोय ? तुम्ही गावातल्या गावात व्ही. पी. करून पाठवता आपलं हस्तलिखित.

भाऊसाहेब : पण ती व्ही. पी. घेतोस ना तू ? परत नाही ना करीत ?

गोपाळराव : खपताहेत ना पुस्तकं तुमची ?

भाऊसाहेब : अन् याचो नाही खपलो ? काय दिलं होतंस त्या कादंबरीला ?

गोपाळराव : द्यायचं काय ? खपली तर देईन म्हटलं होतं—

भाऊसाहेब : आठशे प्रती खपल्या ना ? (ओरडून) खोटं बोलू नकोस. तुझ्या आठशे प्रती खपल्या आहेत. दोनशे दाबून ठेवल्या होत्यास नाहीतर त्यादेखील खपल्या असत्या. काय देणार आहेस याला ?

गोपाळराव : पंचवीस रुपये देतो.

भाऊसाहेब : पंचवीस का ? पानी रुपयाप्रमाणे एकशेसाठ रुपये दिले पाहिजेस त्याला.

गोपाळराव : एकशेसाठ ? त्यापेक्षा माझा गळाच कापा ना !

भाऊसाहेब : तोसुद्धा कापला असता. त्याच लायकीचा आहेस तू.

गोपाळराव : ते यांचं प्रकरण मग मिटवितो मी. पण आज मी आलो होतो—

भाऊसाहेब : माझं पुस्तक तुला मिळायचं नाही.

गोपाळराव : असं कधी झालंय भाऊसाहेब ? तुमचं पुस्तक असलं की प्रकाशक मीच. छाती आहे कुणाची तसं पुस्तक काढायची ? नुसत्या जॅकेटच्या डिझाईनला साठ रुपये देत असतो तुमचं पुस्तक तयार आहे ते मला कळलंय—



55474

**भाऊसाहेब** : कुणी सांगितलं ?

**सुमित्रा** : काल हे आले होते त्या वेळी मी वाचीत बसले होते ते हस्तलिखित. यांनी पाहिलं न् मला विचारलं—

**भाऊसाहेब** : म्हणजे तू सांगितलंस ? बरं, बरं. ( गोपाळरावास ) काय देणार आहेस ?

**गोपाळराव** : ते ठरलेलंच आहे पूर्वीचं. बाबासाहेबांच्या पुस्तकाला पानी रुपया देतो—तुम्हांला देतो अडीच—पैसे मिळतात बाबासाहेबांच्या पुस्तकात अन् ते खर्ची पडतात तुमच्याकडे.

**प्रभाकर** : शिवाय बाबासाहेबांना निम्मेशिम्मे पोचत नाहीत ते निराळेच—

**भाऊसाहेब** : मला दुसऱ्याच्या व्यवहाराशी कर्तव्य नाही. या खेपेला पानी चार रुपये घेणार मी—आणि तेही रोख—आगाऊ.

**गोपाळराव** : तीन. बरं का, तीनावर तोड करा. निम्मे आगाऊ देतो.

**भाऊसाहेब** : निम्मे नाहीत. सगळे पाहिजेत. पाहिजे तर घे नाहीतर चालता हो.

**गोपाळराव** : माझा गळाच कापायला उठलाहात तुम्ही—

**भाऊसाहेब** : उद्या पाठवतो व्ही. पी.

**गोपाळराव** : व्ही. पी. कशाला ? किती हवे ?

**प्रभाकर** : आणले आहेत वाटतं ? मग माझेसुद्धा देऊन टाका ना ते.

**भाऊसाहेब** : हो, हो ? याचा हिशेबसुद्धा चुकता कर आताच. अन् त्या दुसऱ्या पुस्तकाचे—किती हवेत प्रभाकर ?

**प्रभाकर** : तुम्ही सांगाल तितके.

**भाऊसाहेब** : शंभर दे याला.

**गोपाळराव** : शंभर ? त्या वर्तमानपत्रातल्या कात्रणांचे ? शंभर ?

**भाऊसाहेब** : तर मग दीडशे दे.

**गोपाळराव** : बरं, बरं. उद्या देतो शंभर. आज आधी तुमचा हिशोब चुकता करू दे मला. ( खिशातून चेकबुक काढीत ) किती लिहू ?

**प्रभाकर** : त्रावणकोर बँकेचा दिसतोय चेक. बुडाली ना ती ?

**गोपाळराव** : [ चेकबुक खिशात घालून दुसरं काढीत ] असा घोटाळा होतो

हा ! किती लिहू ?

**भाऊसाहेब** : काही लिहू नकोस, उद्या मी व्ही. पी. पाठवतो. याला काय देतोयस आता ? चेक नको—रोख.

[ सारे खिसे चाचपून पाहून एक पाच रुपयांची नोट काढून
गोपाळराव प्रभाकरच्या हाती देतो. ]

**भाऊसाहेब** : किती दिलेस ते ? पाच ? दे ते फेकून.

**गोपाळराव** : काय गल्लत होते ही. मला वाटलं पन्नास.

**भाऊसाहेब** : नोटेची लांबीरुंदीसुद्धा कळत नाही वाटतं ? कुणाला फसवतोस रे गोप्या ? काय वाटलं तुला ? मी बाबासाहेब आहे असं वाटलं ? त्या म्हाताऱ्याला हातोहात फसवीत असतोस—तो फसवून घेतो—वेळी कान पकडीत नाही तुझा म्हणून तुला फावतं. पण तसले डाव माझ्याकडे टाकू नकोस. सरळ व्यवहार करायचा असला तर पैसे रोख मोज—

**गोपाळराव** : पण तुमच्या बाबतीत आजपर्यंत मी कधी भानगड केली आहे का ? अन् मी भानगड केली असती, पण तुम्ही कुठं देता मला सवड ? आधी आगाऊ घेता पैसे, अन् शेवटचे कागद पाठवता व्ही. पी. नं—अन् केव्हा केव्हा तर सगळंच हस्तलिखित व्ही. पी. नं पाठवता—इथल्या इथं—गावातल्या गावात. मी पुष्कळ फसवीन, पण तुम्ही फसवू द्याल तेव्हा ना ?

**भाऊसाहेब** : तर काय तुला मोकळा सोडू ? कितीजणांना फसवलंस आजपर्यंत ? ती चाळ घेतलीस परवा, ती कुठल्या पैशाची ? हिशेब करायला गेलं तर त्या चाळीत त्या बाबासाहेबाचा चौथा हिस्सा तरी निघेल. शिवाय पुढं आणायच्या नावाखाली किती जणांची फुकटी पुस्तकं पदरात पाडली आहेस ? मीच एक तेवढा तुला पुरून उरलो आहे. तुझी बडबड सुरू झाली—तुझे ते खोटे चेक, शंभराची नोट म्हणून दहाची नोट हळूच खिशात टाकणं अन् मग शंभरच दिले होते म्हणून गळी पडणं— त्या तुझ्या साऱ्या गफलतींना पोरंबाळं अन् म्हातारेकोतारे फसत असतील. तिकडे लेखकांनी एक आणा नाही म्हणून चहाची तलफ मारून टाकावी अन् तू इकडे चाळी खरेदी कराव्या—

**गोपाळराव** : ते फसतात फसवून घेतात, मग मी का फसवू नये ? का नाही तुमच्यासारखे सावध राहात ते ?

**भाऊसाहेब** : खरं आहे तुझं म्हणणं. हा आशाळभूतपणाच नडतोय या तरण्या लेखकांचा आणि लाचार म्हाताऱ्यांचा. ते राहू दे, आधी याला पन्नास रुपये देऊन टाक पाहू—

**गोपाळराव** : उद्या नक्की देतो.

**भाऊसाहेब** : उद्या नाही आता दे. [ गोपाळ खिसे चाचपू लागतो. ] तुझे हात सुन्न झाले आहेत. इकडे ये. मीच काढतो तुझ्या खिशातून.

**गोपाळराव** : नाही, नाही, सापडली. हं— [ प्रभाकरला ] ही घ्या. झालं आता ? पटाण आहात तुम्ही लेखक म्हणजे ! बरं, आता उद्या येईल ना व्ही. पी. ? जातो तर. नमस्कार—वैनीसाहेब, नमस्कार—अन् अहो प्रभाकरपंत, आता पुढच्या पुस्तकासाठी दुसरा प्रकाशक बघा. हे कात्रणाचं पुस्तक शेवटचंच बरं. नमस्कार. ( जाऊ लागतो. )

**भाऊसाहेब** : शेवटचं नाही. आता तो कादंबरी लिहितोय ती तुलाच घेतली पाहिजे.

**गोपाळराव** : बरं, बरं. पुढचं पुढं. येतो. नमस्कार [ जातो. ]

**भाऊसाहेब** : अन् आता असं पाहा प्रभाकर—विसरला नसशील, मघाशी तुला दहा रुपयांची नोट दिलीय ती सध्या राहू दे तुझ्याजवळ. किती द्यायचे आहेत माझे पैसे ?

**प्रभाकर** : पाऊणशे वाटतं !

**भाऊसाहेब** : वाटतं का ? सरळ पाऊणशे म्हण ना. ती पन्नासाची नोट दे तिच्याकडे, अन् बाकीचे पंचवीस नि हे दहा पस्तीस, दुसरा हप्ता देईल तो त्याच वेळी आणून दे माझे परत. तू झालं तरी या गोप्याचाच दुसरा भाऊ. उसनवारीवरच चाललाय तुझा सारा कारभार—

**प्रभाकर** : मी तरी काय करू ? मालक पगारच देत नाही चार चार महिने—

**भाऊसाहेब** : मग सत्याग्रह कर. उपास करून धरणं धर त्याच्या दाराशी. तुम्हा पोरंबाळांचे संसार जर मी असे चालवू लागलो तर उद्या माझ्या हाती भिकेची झोळी येईल. त्या बाबासाहेबावरून धडा घेतलाय मी. त्यानं अशीच पोरंबाळं गोळा केली होती. असाच त्यांना चारीत होता. आता जावयाच्या घरी तुकडे मोडीत बसलाय. तसं व्हायला नकोय माझं. जा पाहू आता—[ प्रभाकर

मुकाट्याने नमस्कार करून निघून जाऊ लागतो. ] अन् त्या मुलाखतीचं काय ?

**प्रभाकर :** ( दाराजवळ ) कुठली मुलाखत ?

**भाऊसाहेब :** हिची मुलाखत घेणार होतास ना ?

**प्रभाकर :** मी आहे फकीर—यांना मुलाखत घ्यायला पाहिजे आहे कुणीतरी बाई--आता चार पैसे कमावतो, बँकेत ठेवतो, लग्न करतो, अन् मग पाठवतो तिला यांची मुलाखत घ्यायला.

**भाऊसाहेब :** रागावलास वाटतं ? थट्टासुद्धा कळत नाही तुला ! बरं बरं, उद्या ये. मुलाखत लिहून ही तयार ठेवील. ती येत्या गुरुवारच्या अंकात आली पाहिजे आहे तुझ्या.

**प्रभाकर :** बराय नमस्कार. [ जातो. ]

**भाऊसाहेब :** पन्नास रुपये खिशात पडले असं वाटलं होतं बेट्याला. कसा चेहरा केला पाहिलास ना ?

**सुमित्रा :** ( प्रभाकराने जाताना उघडा टाकलेला दरवाजा बंद करून परत येत ) मला दया आली त्यांची. घेतले असते पुढं तर नसतं का चाललं ?

**भाऊसाहेब :** मोठी आली आहेस दयेची देवी—हं, हं, थांब, दयेची देवी ! कादंबरीला नाव मोठं सुंदर शोभेल. ठरलं--पुढल्या कादंबरीचं नाव दयेची देवी—

**सुमित्रा :** नि ती मुलाखत कशी लिहिणार आहे मी ?

**भाऊसाहेब :** आपलं लग्न व्हायच्या पूर्वी तू लेख लिहीत होतीस ना—तशीच.

**सुमित्रा :** अन् काय लिहिणार आहात त्यात ?

**भाऊसाहेब :** त्याच्याशी तुला काय करायचंय ? मी लिहीन तेवढं आपल्या अक्षरानं नकलून दे म्हणजे झालं. नक्कल करताना कळेल तुला आपोआप.
[ प्रभाकरने दिलेली नोट हातात चाळवीत सुमित्रा पलीकडल्या खुर्चीवर जाऊन बसते. भाऊसाहेब तिच्या जवळ जाऊन खुर्चीला हात धरून मागे उभा राहतो. ]

**भाऊसाहेब :** रागावलीस वाटतं ? दुसऱ्याची दया करून चालत नसतं

सुमित्रा. आधी स्वतःची दया केली पाहिजे. हा पुस्तकं लिहिण्याचा धंदा म्हणजे दरिद्री धंदा आहे. एखादाच पैसे कमावतो या धंद्यावर. लेखक होण्यापेक्षा व्यवहारावर नजर ठेवतो त्याच्याच गाठी या धंद्यात चार पैसे पडतात. हीच व्यवहारी नजर लेखनात ठेवावी लागते. बाजारात काय विकतं ते पाहिलं पाहिजे. नवा बाजार निर्माण केला पाहिजे. असं करताना बऱ्यावाईटाचा विचार करून चालत नाही. बाबासाहेबांच्या लिखाणानंच ना मला स्फूर्ती दिली ? नुसती स्फूर्तीच का,—त्यांचंच लिखाण माझ्या साच्यातून ओतून मी नवा माल म्हणून विकतो आहे. पण ते या वाचकांना कुठं कळतंय ? प्रकाशक कसे असतात ते हे आता पाहिलेसच. असल्या लोकांशी व्यवहार करायचा म्हणजे सापाशी खेळ खेळणं. एवढी कसरत करून जो पैसा मिळवायचा तो काय असा चोरापोरांवारी वाटण्यासाठी ?

**सुमित्रा :** ( चट्कन् उठून उभी राहून ) चोरापोरांवारी का ? किती खस्ता खाताहेत ही माणसं तुमच्यासाठी ! लबाडीसुद्धा करताहेत. ती का ?

**भाऊसाहेब :** का असं वाटलं तुला ? माझ्यावर उपकार करण्यासाठी म्हणून वाटलं ? किती वेडी आहेस ! त्या बाबासाहेबाचा मत्सर वाटतो या तरण्याबांडांना—त्याला पाडण्यासाठी मला मदत करताहेत हे. माझ्यावर उपकार करण्यासाठी नव्हेत. मी निवडून आलो म्हणजे या लोकांना आनंद होईल असं तुला वाटत असलं तर ते साफ चुकीचं आहे. मी निवडून आलो तर यांना आनंद वाटेल—पण तो बाबासाहेब पडला म्हणून. मी निवडून आलो म्हणून नव्हे. ( हातातील घड्याळ पाहून ) आं. ती यायची वेळ झाली वाटतं ?

**सुमित्रा :** कोण ती ?

**भाऊसाहेब :** घाबरू नकोस. तसं काहीच नाही त्यात. ती एक वेडपी कॉलेजातली पोर आहे. ती आताच येणार आहे मला भेटायला. मी आता आत जाऊन बसतो. मी येईपर्यंत तिला जरा खेळवीत ठेव इथं. ( घंटा वाजते. ) आलीच वाटतं ती. [ घाईने आत जातो. ]

[ सुमित्रा दरवाजा उघडते. सुषमा प्रवेश करते. सुषमा फारशी देखणी नाही, पण रंगरोगण करून सुंदर दिसत असल्याचा तिला पाहताच भास होतो. ती आत येताच सुमित्रा ' या बसा ' असे म्हणते पण ती सुमित्रेकडे पाहात नाही.

हॉलच्या मध्यभागी असलेल्या भाऊसाहेबांच्या मोठ्या तसबिरीसमोर जाऊन तसबिरीला हात लावून नमस्कार करते आणि नंतर चोहीकडे नजर फेकते. अशी नजर फेकताना सुमित्रा तिच्या खिजगणतीत नसावी असे दिसून येते. क्षणभराने ती सुमित्रेसमोर येऊन उभी राहते आणि एक क्षणभर तिच्याकडे टक लावून पाहते. अस्वस्थ होऊन सुमित्रा एक दोन पावले मागे हटते. ]

**सुषमा** : ( सुमित्रेला ) कोण तुम्ही ?

**सुमित्रा** : छान ! मघापासून मी ' या बसा ' म्हणते आहे, त्यावरून नाही का कळत मी कोण ती ?

**सुषमा** : कसं कळावं ? ही मी इथं आले आहे, तशाच तुम्हीही आला असाल. अशा आणखी किती तरी येत असतील. भाऊसाहेबांच्या चरणधूलीनं पवित्र झालेल्या या मंगल प्रदेशाला असं ( जमिनीला हात लावून नमस्कार करीत ) वंदन करीत असतील. कोण तुम्ही ?

**सुमित्रा** : मी या घरची मालकीण.

**सुषमा** : असं ? इथं तुमच्याकडेसच राहतात वाटतं भाऊसाहेब ?

**सुमित्रा** : नाही. मीच असते त्यांच्याकडे.

**सुषमा** : खरंच ? आणखी कुणी असतात का त्यांच्याकडे ? मला ठेवून घेतील का ते इथं ?

**सुमित्रा** : अहो, मी बायको आहे त्यांची.

**सुषमा** : ( तोंड वेंगाडून ) बायको ? अंः ! बायको ! पत्नी तरी म्हणायचं. बायको नाही ?

**सुमित्रा** : का ? कुणाची बायको असणं तुम्हांला आवडत नाही वाटतं ?

**सुषमा** : कुणाची नव्हे—भाऊसाहेबांची. साऱ्या जगावर सत्ता आहे त्यांची. साऱ्या जगाची सत्ता आहे त्यांच्यावर. त्यांची बायको का तुम्ही ? कोण कुणाची बायको ! कोण कुणाचा नवरा !

**सुमित्रा** : मी त्यांची बायको नि ते माझे नवरे.

**सुषमा** : नाही. अशक्य. अगदी अशक्य. बायको म्हणजे बंधन. साऱ्या जगाच्या अफाट निर्विकार प्रेमानं ज्यांचं हृदय भरून गेलं आहे, त्यांना बंधनात टाकणारी––त्यांच्या प्रेमावर सत्ता गाजवणारी—त्यांच्या संसाराला

मर्यादा घालणारी—बायको ?—नाही. नाही. कल्पांतीही नाही.

**सुमित्रा :** वेड तर लागलं नाही तुम्हांला ?

**सुषमा :** हो वेडच लागलं आहे. जगातली सारी माणसं जर शहाणी आहेत म्हणायची, तर मग मला वेडीच म्हणा. किती गोड आहे हे वेड !—

**कोणा कशी कळावी वेडात काय गोडी**
**ही प्रेममूढतेची सुटती न गूढ कोडी**
**सोडूनि नाव गावा**
**शोधावया विसावा**
**तुडवीत कंटकाची ती वाट नागमोडी**
**लहरीवरी फिरावे**
**जळि वेत हेलकावे**
**जाणोनि लोटिली मी या वादळात होडी**
**दिसती अजाण भोळे**
**परि हे फितूर डोळे**
**माझ्या मनोगताची करितील ग चहाडी**
**हसले कुणी हसू दे**
**रुसले कुणी रुसू दे**
**राही कबूतरांची दारावरात जोडी ॥**

[ ती गात असताना सुमित्रा डोके धरून खुर्चीत बसते. ]

**सुमित्रा :** झालं तुमचं गाऊन ?

**सुषमा :** गाऊन ? हे गाणं का होतं ? प्रेमाच्या ओलाव्यानं रुक्ष गद्याच्या कोरड्या बुंधाला पालवी फुटते. त्या हिरवळीचे तरळणारे आलाप ऐकणाऱ्याला संगीतमय वाटतात. ते हे रुक्ष गद्याचं संगीतीकरण. हीच ती प्रेमाची भाषा.

**सुमित्रा :** असं का ?

**सुषमा :** तुम्हांला माहीत नव्हतं का हे ? आणि आपण त्यांची बायको आहे म्हणता ? अरेरे ! बिचारे भाऊसाहेब !—कुठं आहेत ते ?

**सुमित्रा :** असतील कुठंतरी.

**सुषमा :** असतील कुठंतरी ! कुठं असतील ते ? इथंच नाही का आहेत ते ? ते इथं आहेत—ते इथं आहेत—ते इथं आहेत—जगातले सारे अणुरेणू परमाणू भरून राहिले आहेत—

**सुमित्रा :** मग मला कशाला विचारलंत ?

**सुषमा :** खरंच. कशाला मी तुम्हांला विचारलं ! ते पाहा—ते पाहा—ते त्या टेबलाजवळच्या खुर्चीवर बसले आहेत—( टेबलखुर्चीजवळ जाते ) केवढी भाग्यवान ही खुर्ची ! इथंच ना बसतात ते ?—[ सुमित्रा उत्तर देत नाही. ] इथंच ना बसतात ते ? नाहीतर त्यांची खुर्ची म्हणून मी समजायची नि ती तुमची असायची—

**सुमित्रा :** ( रागाने ) हो, तिथंच बसतात ते.

**सुषमा :** ( टेबलावरील पेन उचलून ) याच पेनानं लिहितात ना ते ?—अन् ही पेन्सिल ! त्यांचीच ना ही ?

**सुमित्रा :** हो, हो. त्यांचीच.

**सुषमा :** लिहिताना ही पेन्सिल जिभेला लावतात का ?

**सुमित्रा :** हो. मोठी वाईट खोड आहे ती त्यांना.

**सुषमा :** ( पेन्सिलीचे चुंबन घेऊन ) केवढी भाग्यवान ही पेन्सिल !

**सुमित्रा :** ( एकदम बसल्या जागेवरून उठून तिच्याजवळ जात ) अहो बाई, हे काय चाललं आहे ? परक्याच्या घरात शिरून वाटेल त्या जिनसा हाताळता आहात—

**सुषमा :** नुसती हाताळली ? नाही बरं ! ( सुरावर ) कुरवाळली—हुंगिली—चुंबिली.

**सुमित्रा :** आता पुरे करा. गाऊ नका.

**सुषमा :** ( एकदम सुमित्रेकडे वळून ) कोण हो तुम्ही मला हुकूम करणाऱ्या ?

**सुमित्रा :** सांगितलं ना ? मी या घरची मालकीण.

**सुषमा :** मालकीण ! दुर्दैवी स्त्रिये, तू इथली मालकीण तर इथला नोकर कोण ?

**सुमित्रा :** इथली नोकर तू. नि दुसरा आमचा रामा गडी. अन् चिंगी मोलकरीण.

**सुषमा :** ( एक सुस्कारा टाकून येऊन खुर्चीवर बसते. ) अरेरे ! बिचारे ! रसिकतेचा गंधसुद्धा नसलेल्या या स्त्रीबरोबर कसं आयुष्य कंठताहेत ?

**सुमित्रा :** ते आता त्यांनाच विचारा. पण आधी मला हे सांगा, तुमचं नाव काय ?

**सुषमा :** सुषमा !

**सुमित्रा :** सुषमा कोण ?

**सुषमा :** सुषमा कोण ! काय करायचं आहे आडनावाशी ?

**सुमित्रा :** पण शाळेत काय नाव लावलं होतं तुमचं ?

**सुषमा :** मी कॉलेजात असते. माझी कीव करा, मी कॉलेजात असते. रुक्ष, निर्बुद्ध, अरसिक प्रोफेसरांची व्याख्यानं मला रोज ऐकावी लागतात—

**सुमित्रा :** मग सोडा कॉलेज.

**सुषमा :** सोडलं असतं. पण मला लेखिका व्हायचं आहे. पदवी नसली तर माझ्या लेखनाला कोण विचारील ? त्या लेखनासाठी मला हे दिव्य करावं लागतंय. भाऊसाहेबांच्या चरणाशी बसून मला लेखणी चालवायचे धडे घ्यायचे आहेत. तो कॉलेजात होणारा वेळेचा अपव्यय —त्या अपव्ययाची भरपाई इथं बसून करायची आहे मला—( एकदम उठून आपले दोन्ही हात सुमित्रेच्या खांद्यावर ठेवते ) I love him. I love him madly !

( सुमित्रा तिला लोटून आतल्या दाराजवळ धावत जाते आणि तिथूनच ओरडते. )

**सुमित्रा :** आता या एकदा बाहेर. किती अंत पाहता माझा ?

**सुषमा :** ( सुरावर म्हणते. ) किती अंत पाहता माझा :—

**का दयाळा अंत माझा पाहसी**
**ये उडोनी राजहंसा मानसी**
**दूरदेशी गुंतला माझा धनी**
**शोधिते ग त्या विहंगाला वनी**
**आडवे हे हात सारोनी दुरी**
**मेघमाले येउ दे त्याला घरी**

मारिला की तीर कोणी फेकुनी
भंगले काळीज राया रे कुणी
या वियोगे ही झुरे संयोगिता
केंवि राया योगराया भेटसी
घ मला पंखांत माझ्या पाखरा
प्रीतिची ती ऊव सेवू दे मशी

[ ती पद गात असता भाऊसाहेब एकेक पाऊल टाकीत हळूहळू बाहेर येतात. तिचे पद संपण्याच्या सुमारास तिच्यासमोर येऊन उभे राहतात. तोपर्यंत ती त्यांच्याकडे पाहात नाही. त्यांना पाहताच आस्ताई म्हणून त्यांच्या पायावर मस्तक ठेवते. ]

**सुमित्रा :** वेडीच आहे वाटतं ही ?

**भाऊसाहेब :** तू जा. आत जा.

**सुमित्रा :** नाही. एवढं ऐकल्यावर आता आत ? प्राण गेला तरी उठणार नाही इथून. ( असे म्हणून एका खुर्चीवर बैठक मारून बसते. )

**सुषमा :** ( भाऊसाहेबांना ) पाहिलंत ? हिरव्या डोळ्याच्या राक्षसानं कशी हिची पकड घेतली आहे ती पाहिलंत ?

**भाऊसाहेब :** वत्से,—

**सुषमा :** अहाहा ! वत्से ! !

**सुमित्रा :** वत्से नव्हे, सुषमा नाव आहे तिचं.

**भाऊसाहेब :** वत्से ! वत्से—सुषमे—शिष्योत्तमे, देवी सरस्वती तुझं कल्याण करो.

**सुषमा :** ( सद्गदित होऊन ) केवढा भाग्याचा दिवस हा ! किती युगं या क्षणाची मी वाट पाहात होते ! हृदयाच्या नेत्रांनी युगयुगांतरापासून नक्षत्रांच्या ताटव्यात बसून तुमची प्रतीक्षा करीत होते. तो भाग्यरवी आज उगवला. नक्षत्रं निस्तेज झाली. नेत्राला नेत्र मिळाले. हृदयाला हृदय—

**सुमित्रा :** अग ए पोरी,—

**सुषमा :** बायको ! ही तुमची बायको ! का या बंधनात पडलात ? अनिर्बंध, अनिर्वाच्य, निर्विकार प्रेमाचा अखिल जगताला प्रकाश देणारे तुम्ही—ते तुम्ही

या अंधाराच्या खाईत—या मत्सराच्या दरीत कसे सापडलात? बायको अं!

**भाऊसाहेब :** बंधनाच्या अनुभवाशिवाय बंधनाची अनुभावना कळत नसते वत्से. ते बंधन प्रेमाचं असलं—अनुनयाचं असलं तर ते बंधन म्हणजेच मुक्ती वाटते. संसाराचं बंधन, कौटुंबिकतेचं बंधन म्हणजे नरकवास. त्या बंधनाचं जाज्वल्य स्वरूप ज्याला दिसतं—ज्याला जाणवतं—तोच अनिर्बंध प्रेमाचं निर्विकार स्वरूप यथातथ्य चितारायला समर्थ असतो. ते सामर्थ्य येण्यासाठीच मी हे बंधन पत्करलं. वत्से–बाळे–प्रियतमे—

**सुषमा :** ) अहाहा!

**सुमित्रा :** ) मी ऐकते आहे म्हटलं!

**भाऊसाहेब :** अशरीरी वाणी पंचेंद्रियांच्या पलीकडची असते. ती बोलली जात नाही–ऐकली जात नाही. मुक्या भाषेचे ते अनिर्बंध बोल हृदयानं ऐकायचे असतात. ऐकलंस सुमित्रे, ते तुला कळायचं नाही. ते हिला कळतं. ते हिला ऐकू येतं. थांब,—( एक क्षणभर डोळे मिटून तो स्वस्थ उभा राहतो. ) ऐकलंस वत्से—

**सुषमा :** हो, ऐकलं. अगदी स्पष्ट ऐकलं. अगदी शब्दन् शब्द ऐकला.

**सुमित्रा :** ( उठून तिच्याजवळ येऊन ) काय ऐकलंस?

**सुषमा :** काय ऐकलं! मुक्या भाषेचे ते बोल या जड जिव्हेनं कसे उच्चारू? अपवित्र होतील ना ते? या पापी देहाच्या संपर्कानं त्या पवित्र शब्दांचा उच्चार कोमेजून नाही का जायचा?

**भाऊसाहेब :** ऐक सुमित्रे, ऐक. फुकट–फुकट इतकी वर्षं माझ्या सहवासाला राहिलीस. कधीसुद्धा हिची भेट झाली नव्हती. पण पहिल्याच भेटीला—

**सुषमा :** नका हो असं म्हणू. अनंत युगांच्या अंतराळात मी तुम्हांला रोज पाहात होते. सतीनं शंकराला प्रेम शिकवलं त्या वेळी मी कैलासपर्वतावरची एक फुललेली वेल होते. तुम्ही वृक्ष होता. त्या तुम्हांला विळखा घालून सतीचे ते प्रेमाचे बोल मी माझ्या हृदयात साठवले होते. त्या वेळी ही तिथली शिळा होती—

**सुमित्रा :** कोण? मी?—मी शिळा? मग कुठल्या रामाच्या पायाच्या स्पर्शानं उद्धार झाला माझा?

**सुषमा :** किती गोड गोड गोड बोललात ? पाहिलंत ? प्रेमाच्या जादूनं इथलं सारं वातावरण कसं भरून गेलंय ! हेच—हेच ते पाय. ( पायाला हात लावून नमस्कार करते. ) याच पायांच्या स्पर्शानं तुम्हांला चैतन्य मिळालं बरं सुमित्राबाई. चैतन्य मिळालं खरं, पण ते शिळेचं काठिण्य काही अजून गेलं नाही—जन्मजन्मांतराच्या सहवासानंसुद्धा गेलं नाही. मी वेल—फुललेली वेल—या वृक्षाला ओळघून—या वृक्षाच्या आश्रयानं जगणारी वेल—या वृक्षाच्या कृपेनं फुलणारी वेल—या सदापूर्ण जलाशयात फुललेलं मी कमल—पाहिलंत ? ते मानससरोवर—तो नरनारायणांचा आश्रम—हरिहरांची भेट तिथंच झाली त्या मानससरोवरातलं मी कमल—प्रेमाची दीक्षा मला त्या कैलासपर्वतावर मिळाली. ते व्रत अजून चालवतेय मी. त्या प्रेमाची ही सुषमा !—थांबा, आता बोलायचंय मला—हृदयाच्या भाषेनं बोलायचंय—( डोळे मिटून क्षणभर स्तब्ध राहते. नंतर डोळे उघडून भाऊसाहेबाला ) ऐकलंत ?

**भाऊसाहेब :** हो ऐकलं.

**सुषमा :** कळलं ?

**भाऊसाहेब :** हो कळलं.

**सुमित्रा :** काय कळलं ?

**सुषमा :** तुम्हांला नाही कळायचं ! गुरुदेवा, हृदयेशा, परमेश्वरा, कळलं ना मी काय सांगितलं ते ?

**भाऊसाहेब :** वत्से, प्रियतमे,—बाळे—प्राणवल्लभे, कळलं बरं—सारं काही कळलं.

**सुमित्रा :** ( दातओठ खात ) केरसुणी कुठं आहे ती ? [ असे म्हणत आत जाते. ]

**भाऊसाहेब :** वत्से, जा आता.

**सुषमा :**

**किती अंत पाहसी माझा ।**
**हृदयाचा तू मम राजा ॥**

[ गात गात निघून जाते. ]

[ सुमित्रा हाती केरसुणी घेऊन तिच्यामागे धावत बाहेर जाते. भाऊसाहेब धावत दाराजवळ जाऊन तिला हाका मारू लागतात आणि ती परत येताच तिच्या हातची केरसुणी घेऊन दूर फेकून देतात. ]

**भाऊसाहेब** : किती वेडी आहेस ! ( मोटमोठ्याने हसतो आणि लगेच थांबून ) गेली ना ती ?

**सुमित्रा** : गेली ? नुसती पळत सुटली. माझा अवतार पाहिलंन् तेव्हा कसलं काव्य आणि कसलं गाणं—जिन्यावरून उड्या टाकीत पळून गेली. मला आश्चर्य वाटतंय ते तुमचं. ही असली नाटकं करायला काहीच कसं वाटत नाही तुम्हांला ? कशाला त्या खुळ्या पोरीला आणखी वेड लावलंत ? चार मंडळीत बसल्या वेळी तिनं जर तुम्हांला पुन्हा पाहिलं, रोज बोलत असता तसे बोलताना ऐकलं, तर काय वाटेल तिला ?

**भाऊसाहेब** : काही नाही वाटायचं. इतरांबरोबर मी जसा वागतो तसा तिच्याशी वागणार नाही हे तिला चांगलं माहीत आहे. माझ्याकडे पाहायची तिची नजर तिच्या वृत्तीप्रमाणे आहे—इतरांच्या वृत्तीशी तिचा मेळ बसायचा नाही. तिला उलट आनंदच वाटेल या गोष्टीचा. मला अगदी चांगला अंदाज आहे प्रत्येकाच्या मनोवृत्तीचा. माझी पुस्तकं वाचून तिनं काही निदानं ठरवली आहेत. मी तसाच दिसलो पाहिजे तिला. नि आता मी तिला तसाच दिसलो-म्हणूनच ती एवढ्या आनंदानं निघून गेली. कसं आठवत नाही तुला ? तू काय केलं होतंस ? अशीच नाही का मला पत्रं पाठवली होतीस ? अशीच नाही का माझी भेट घ्यायला आली होतीस ?

**सुमित्रा** : पण त्या वेळी तुम्ही अशी नाटकं केली नव्हती.

**भाऊसाहेब** : अगदी बरोबर. तुझी वृत्ती मी ओळखली होती—तुझ्या पत्रांवरून ओळखली होती. अन् म्हणूनच मी असा लटका बनाव केला नाही तुझ्याबरोबर. अन् म्हणूनच मी तुझ्याशी लग्न केलं. त्या वेळी मला माझी बायको पाहिजे होती—

**सुमित्रा** : अन् या वेळी ?

**भाऊसाहेब** : या वेळी मला माझ्या पुस्तकांचा खप वाढवायला उपयोगी पडणारी एक अजाणती एजंट पाहिजे आहे. आता प्रत्येक कॉलेजातल्या प्रत्येक

पोरीसमोर ती माझ्याबद्दल बोलू लागेल, चांगलं पदरचं तिखटमीठ लावून माझ्या भेटीची काव्यात्मक वर्णनं करील, अन् मग प्रत्येक कॉलेजातल्या वाङ्मयमंडळाकडून मला व्याख्यानाचं आमंत्रण येईल. कॉलेजातल्या टेंगण्या मेंदूच्या विद्यार्थ्यांत लोकप्रियता मिळवायला यापेक्षा आणखी काय हवं ? अग, हा व्यवहार आहे. आता मी तुला सांगत होतो ते हेच. मालाच्या गुणावर माल खपत नाही. त्या मालाचं लेबलही चांगलं पाहिजे अन् जाहिरातही चांगली घसघशीत झाली पाहिजे. जगाला संदेश देण्यासाठी काही मी लेखणी उचललेली नाही. तसा संदेश देत बसलो असतो तर त्या बाबासाहेबासारखं कुणाच्यातरी ओसरीला राहून धर्माचे तुकडे मोडीत बसावं लागलं असत मला. अशी खुळं नाचवण्यासारखंच काहीतरी मला लिहावं लागतं. अन् ही अशी खुळं नाचू लागली की माझी गोळी अचूक लागू पडली असा मला विश्वास येतो. वाचकाच्या नाडीवर सारखा हात ठेवून मला हे लेखन करावं लागतंय याची कल्पना तुला कशी येणार ?

**सुमित्रा** : तेव्हा तरी हे कळलं असतं !—

**भाऊसाहेब** : तर काय केलं असतंस ? लग्न केलं नसतंस माझ्याशी ? आता काय बिघडलंय त्यात ? चांगली चैनीत आहेस–सुखात आहेस. गडगंज भरलंय घर. जो येतो तो आधी तुला विचारतो. तो प्रभाकर आता मुलाखत मागत होताच की नाही ?

**सुमित्रा** : मग हे आजचं प्रकरण देऊ का त्या मुलाखतीत ?

**भाऊसाहेब** : तू कोण देणार ? आता तू न् मी एक झालो आहोत. जे मी म्हणेन ते तुझं म्हणणं. आता स्वतंत्र अशी भाषाच नाही तुला.

**सुमित्रा** : तुम्ही मला बोलू देताहा कुठं ? एक शब्द तोंडातून काढायची खोटी, की ही फरड लागते तुमच्या बोलण्याची. बायको होऊन बसले आहे ना तुमची ? ‘ बायको ’ म्हटल्याबरोबर आताची ती पोरटी कशी तोंड वाकडं करीत होती–तेव्हा तिचा राग आला होता मला, पण आता पटतंय, बायको म्हणजे शून्य. पुरुष म्हणजे एकाचा आकडा. तो आकडा मागं पडल्याशिवाय त्या शून्याला किंमत नाही.

**भाऊसाहेब** : कसं छान बोललीस ! एवढं आता अगदी नीट चांगलं ध्यानात

ठेव म्हणजे केव्हाच त्रास व्हायचा नाही तुला.

**सुमित्रा :** ते ठेवते ध्यानात–चांगलं रक्ताच्या शाईनं लिहून ठेवते. पण पुन्हा या असल्या पोरट्या येता नयेत माझ्या घरात. [ भाऊसाहेब हसतो. ] हसता काय ? शून्याला किंमत नसली तरी आकार असतो—तसा आकार आहे मला —बायको म्हणून काही हक्क आहे माझा. तुमची बायको झाले तेव्हापासून मनाला काही तरी वाटून गेलंय. ते आता बदलायचं नाही. सत्ता उत्पन्न झाली आहे. त्या सत्तेला हे असले चाळे खपत नाहीत.

**भाऊसाहेब :** पण या असल्या चाळ्यांशिवाय माझा धंदा चालायचा नाही. ही अशी ढोंगं केलीच पाहिजेत. तुला सांगूनच ना सारं काही करतोय ?

**सुमित्रा :** ते खरं आहे. पण हे असं ढोंग करता करता कुणी तरी मेली खरोखरीची गळी पडायची—

**भाऊसाहेब :** अन् पडली, तर काय बिघडलं त्यात ? माझा मी सावध आहे ना ?

**सुमित्रा :** पण मला येईल ना झीट. ते काही नाही. यापुढं अशी कुणी येता कामा नाही इथं. आली तर झिंज्या पकडून तिला बाहेर लोटून देईन. [ भाऊसाहेब मोठमोठ्याने हसतो. ] हसायला काय झालं ? तंबी नाही देत ही. प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हा कळेल. अगदी एवढीसुद्धा मागपुढं पाहायची नाही.

**भाऊसाहेब :** अन् मग तुझ्या मुलाखतीत जे आपल्या प्रेमाचं वर्णन येणार आहे त्याचं कसं काय समर्थन करशील मग ?

**सुमित्रा :** मग नकाच देऊ ती मुलाखत. ती मुलाखत नको नि ते समर्थनही नको. मी अगदी स्पष्ट सांगून ठेवते, पुन्हा अशी कुणी आली अन् असलं हे 'प्रियतमे आणि प्राणवल्लभे' सुरू झालं, तर तिच्यासमोर अंगावर घासलेट ओतून काडी लावून घेईन. [ बाहेर घंटा वाजते. ] कोण आलं आता आणखी ? [ जाऊन दार उघडते. ]

[ बाळासाहेब प्रवेश करतो. तो एक प्रकाशक आहे. साधारण पन्नाशी उलटलेला, केस पिकलेला, गुडघ्यापर्यंत धोतर, लांब कोट, तांबडी पगडी, गळ्याभोवती टाकलेले उपरणे, हातात एक हरणछाप छत्री, असा त्याचा

वेष आहे. ]

**भाऊसाहेब :** या बाळासाहेब. बसा. अग चहा ठेव बाळासाहेबांना ( जाण्यासाठी तिला डोळ्याने खूण करतो. )

**बाळासाहेब :** नको, नको. आताच चहा घेऊन आलो.

**सुमित्रा :** असं का ?—

**बाळासाहेब :** फार वेळ चहा घेतलेला मला खपत नाही. खरंच आता नको चहा मला. बसा तुम्ही वहिनी. बाकी वहिनी कसल्या म्हणा, तुझ्या एवढ्या चार सुना मुली आहेत माझ्या घरी. लंगोटी लावीत होते हे भाऊसाहेब तेव्हापासून त्यांना पाहतोय—

**भाऊसाहेब :** असं एवढं कितीसं अंतर आहे तुमच्या माझ्या वयात ? फार तर दहा—बारा वर्षांचं.

**बाळासाहेब :** म्हणजे तुम्ही आठ वर्षांचे होता तेव्हा मी विशी उलटून तिकडे पुस्तकाचं दुकान उघडलं होतं. जाऊ द्या. ते हिशेब कशाला हवेत ? वयाजवळ काही मोठेपणा नसतो. तुमचं एवढं नाव गाजतंय जिकडे तिकडे अन् आम्ही बसलो आहोत पुस्तकं विकीत.

**भाऊसाहेब :** ते खरं. पण तुम्ही आहात म्हणून आम्ही आहोत. तुम्ही नसता तर आम्हांला कोण विचारणार होतं ?

**बाळासाहेब :** हा आपला तुमचा विनय आहे. अहो शंभर प्रकाशक लागले असते तुमच्यामागं.

**भाऊसाहेब :** पण कुणी तरी प्रकाशक पाहिजेच असतो ना आम्हांला ?

**बाळासाहेब :** हे नुसतं म्हणायचं. तुम्हीच तुमची पुस्तकं छापली असती तरी देखील काही बिघडलं नसतं. ते पुण्याचे जोशी आहेत ना—ते पाहा, लिहिण्यापेक्षा छापतातच जास्त. अन् वर तोंड वेंगाडायला नको कुणाकडे. तुमच्यासारख्यानं केला असता हा धंदा तर आम्हा लोकांची एव्हाना थोबाडं फुटून गेली असती. तसला चौरसपणा आहे तुमच्याकडे; म्हणूनच म्हणतो, की तुमचे उपकार आहेत आमच्यावर.

**भाऊसाहेब :** काय होतं काम आज ?

**बाळासाहेब :** ते तुमचं भाषण पाहिजे मला.

**भाऊसाहेब** : कसलं भाषण ?

**बाळासाहेब** : ते तुमचं अध्यक्षाचं भाषण.

**भाऊसाहेब** : कुठल्या अध्यक्षाचं ?

**बाळासाहेब** : साहित्य महासभेच्या अध्यक्षाचं.

**भाऊसाहेब** : पण मी कुठं अध्यक्ष झालोय.

**बाळासाहेब** : झालाहा—मी सांगतो तुम्हाला--तुम्ही अध्यक्ष झाला आहा. ते भाषण मला पाहिजे. दुसऱ्या कुणाला मिळता नये ते. आणि यापुढं तुमच्या साऱ्या पुस्तकांचं कंत्राट मीच घेणार. कुणालाच द्यायचं नाही तुमचं पुस्तक. चांगला पानी दीड रुपया धरून ठरवून टाकू. [ भाऊसाहेब हसतो. ] हसू नका. माझा व्यवहार अगदी चोख आहे. तीन पुस्तकांचे पैसे आगाऊ देतो. मग तर झालं ?

**भाऊसाहेब** : अन् तितक्यात मी मेलो तर ?

**सुमित्रा** : असं अभद्र बोलू नये काहीतरी.

**भाऊसाहेब** : ते कुणाच्या हाती का असतं ? वरचा हुकूम आला की गेलं पाहिजे. अन् तसं काही झालं तर माझ्या मागं तुम्ही माझ्या नावानं खडे फोडायला नकोत.

**बाळासाहेब** : हा व्यवहार आहे—व्यापार आहे--व्यापार करता सोळा बारा हे व्हायचेच. सट्टेवाले एवढी धाडसं करतात, तितकं काही हे धाडस नाही. देव तुम्हांला उदंड आयुष्य देवो अन् तुमच्या नावावर मलाही चार पैसे मिळोत.

**सुमित्रा** : तथास्तु ! तुमच्या तोंडात साखर पडो. तीन पुस्तकांचे किती होतात पैसे ?

**भाऊसाहेब** : हे पाहा, पैसे मिळवायचं काम मी करतोय--खर्चायचं जोखीम तू घे. बाळासाहेबांशी व्यवहार आहे हा—एका बैठकीत काम भागायचं नाही. भिडस्तपणा करून असले व्यवहार व्हायचे नाहीत.

**बाळासाहेब** : तुम्ही तसे अगदी निर्भीड आहात भाऊसाहेब. मला जे तुमचं आवडतं ते तेच. आधी होय म्हणायचं, सारं काही ठरवायचं नि मग बाळासाहेबानं माझी मुंडी मुरगळली म्हणून ओरडा करायचा, असला तो बाबासाहेबी व्यवहार नकोय मला—

**भाऊसाहेब :** मला दुसऱ्याच्या व्यवहाराशी काही कर्तव्य नाही. माझा मी समर्थ आहे. अशी कुरकूर करायचा प्रसंग कधीच आला नाही माझ्यावर. आता एक पुस्तक माझ्याकडे तयार आहे. गोप्या मागणी करून गेला आहे—

**बाळासाहेब :** ते गोप्याचं नकोय माझ्याकडे. तो आज पुस्तक छापील अन् उद्या खाका वर करून पुस्तकं देऊन टाकील एखाद्या मुडदेफरासाला. मी गठ्ठे बांधून ठेवीन पण माझं पुस्तक फुटपाथवर यायचं नाही. पाहिलंत कधी माझं पुस्तक फुटपाथवर आलेलं ?

**भाऊसाहेब :** पुस्तकं गठ्ठे बांधून ठेवा की फुटपाथवर फेका, मला त्याची पर्वा नाही. मला माझा दर मिळाला पाहिजे.—

**बाळासाहेब :** पण आधी हे तुमच्या भाषणाचं ठरवू—

**भाऊसाहेब :** भाषणाच्या कंत्राटात तीन पुस्तकांचं नाव नको. करार करायचा तो चारी पुस्तकांचा. नुसतं भाषणाचं बोलून चालायचं नाही. गोप्या पानी चार रुपये देतो—

**बाळासाहेब :** भाषणाचेसुद्धा ?

**भाऊसाहेब :** नव्हे, नुसत्या पुस्तकाचे.

**बाळासाहेब :** भाषणासाठी माझा आग्रह एवढाच, की हजारो माणसांत ते वाटलं जाणार; तेव्हा माझ्या इतर पुस्तकांची त्यात जाहिरात करता येईल—

**भाऊसाहेब :** ते मला माहीत आहे. एरवी कुठं करताहात तुम्ही कुठल्या पुस्तकाची जाहिरात ?—मग काय ? चार रुपये कबूल ?

**बाळासाहेब :** मी हिशेबच ठेवतो तुमच्या समोर.

**भाऊसाहेब :** मला हिशेबाशी काही कर्तव्य नाही. प्रुफाच्या कागदावर माझं पुस्तक छापलंत तरी माझी हरकत नाही. जॅकेट मात्र चांगलं हवं—तेवढीच माझी अट आहे.

**बाळासाहेब :** ( डोके खाजवीत ) मला एकदा हिशेब करून पाहिला पाहिजे, चार छापखान्यांत विचारलं पाहिजे—

**भाऊसाहेब :** उद्या सकाळच्या आत मला काय ते कळलं पाहिजे. नाहीतर दुपारी गोप्याला व्ही. पी. पाठवायला हवी.

**बाळासाहेब :** तर मग असं करतो. उद्याचा दिवस थांबा. उद्या

संध्याकाळपर्यंत नक्की कळवतो. तोपर्यंत व्ही. पी. पाठवू नका कुणालाच. पण भाषण मात्र माझंच—त्यात आता वांधा नाही. त्याचे तुम्ही म्हणाल तितके देईन. पुढं त्या स्वागतमंडळाकडून घेईन वसूल करून.

**भाऊसाहेब** : ते मला माहीत आहे. ते तुम्ही काय वाटेल ते करा.

**बाळासाहेब** : बरं तर, येतो, नमस्कार. थोडं मागंपुढं झालं तरी या वेळी जरा चालवून घ्या. तुमचा आमचा व्यवहार एकदा व्यवस्थित सुरू होऊ दे. माझी खात्री आहे, की एकदा माझा अनुभव आला की तुम्ही दुसरीकडे जाणारच नाही. बरं येऊ ? नमस्कार ! ( सुमित्रेला ) नमस्कार. जरा एवढं लक्ष ठेवा हं तुम्हीही—[ जातो. ] [ सुमित्रा दरवाजा बंद करून घेऊन बसते. क्षणभर दोघेही बोलत नाहीत. ]

**सुमित्रा** : परक्यादेखत माझा असा पाणउतारा करता ! काय वाटलं असेल त्यांना !

**भाऊसाहेब** : काही वाटलं नाही. काही वाटलं असतं तर जाताना नजर ठेवायला का सांगितलं असतं त्यानं ? जुन्या काळचा माणूस आहे तो. बायको काही बाबतींत नवऱ्याच्या मुठीत असते, तसा नवराही काही बाबतींत बायकोच्या मुठीत असतो असं समजणारी जी एक पिढी आहे त्यातला हा शेवटचा दुवा आहे. त्याच्याशी कसं वागायचं ते तुला कळायचं नाही. अन् हे पाहा, या माझ्या पैशाच्या व्यवहारात तू केव्हाच तोंड घालीत जाऊ नकोस.

**सुमित्रा** : अन् कोणत्या व्यवहारात मी तोंड घातलं तर चालेल ?

**भाऊसाहेब** : कोणत्या ! तसं पाहिलं तर कोणत्याच व्यवहारात तू तोंड घालायला नकोस. वृक्षावरच्या वेलीनं वृक्षाची काळजी करायला नको असते. तो वृक्ष स्वतःच चांगला खंबीर असतो. त्या वेलीनं नुसतं त्याला मिठी मारून राहायचं, फुलायचं, हसायचं, बागडायचं—

**सुमित्रा** : असंच कायसं म्हणत होती ती.

**भाऊसाहेब** : चांगला अभ्यास केला आहे वाटतं तिनं माझ्या पुस्तकांचा ! स्त्री म्हणजे चूल आणि मूल यांची धनीण असं म्हणण्याइतका मी मागासलेला नाही. पण तिनं पुरुषाच्या बरोबरीनं पौरुष दाखवावं असं म्हणणारे सारे मूर्ख आहेत असं माझं ठाम मत आहे. ती वेल आहे—वृक्ष नव्हे. तिनं

वृक्षाच्या आश्रयानंच राहिलं पाहिजे. वृक्षाची शोभा वाढवली पाहिजे. स्त्री हे पुरुषाचं लेणं आहे, जिणं नव्हे. पुष्कळांनी प्रयत्न केले पण ते साध्य झाले नाहीत. पुरुष तो पुरुष आणि स्त्री ती स्त्रीच ! हा निसर्गाचा सिद्धांत खोडून काढणं काही स्त्रीच्या हातो नाही, याच तत्त्वाचा मी प्रचार करतो आहे. स्त्रीला स्वातंत्र्य पाहिजे, नाही असं नाही, पण त्या स्वातंत्र्याला मर्यादा पाहिजे. स्त्रीपणाची मर्यादा ओलांडून तिनं पुरुषी बनू नये एवढं दावं—खूप लांबीचं दावं—पण दावं पाहिजे तिला. तिच्या कल्याणासाठीच ते दावं पाहिजे. तिला कल्पना नसते आपल्या ताकदोची. लेनिननं केला होता म्हणे तो प्रयत्न दावं सोडायचा. पण आता तो प्रयोगदेखील ढासळत आलाय म्हणे. स्त्रियांचं स्वातंत्र्य म्हणजे एक गोड स्वप्न आहे. त्या स्वप्नाच्या भुलावणीवर त्यांना नुसतं तरळत ठेवलं पाहिजे. त्या स्वप्नातून जागं होऊ देता नये त्यांना. ते स्वप्न म्हणजे स्वप्न नव्हे असंच वाटू दिलं पाहिजे त्यांना, तरच पुरुषाचा संसार सुखाचा होईल.

**सुमित्रा** : अन् स्त्रियांचा संसार ?

**भाऊसाहेब** : तोच स्त्रियांचा संसार. स्त्रियांना पुरुषाशिवाय दुसरा संसार नाही.

**सुमित्रा** : अन् पुरुषांना ! त्यांनी जगभर आपला संसार फैलावीत बसायचं वाटतं ?

**भाऊसाहेब** : आता तू कुजकं बोलू लागलीस. पुन्हा एकदा माझी पुस्तकं वाच. नीट लक्षपूर्वक वाच. केवढ्या मोठ्या शिखरावर मी बसवलंय स्त्रीजातीला—

**सुमित्रा** : स्वप्नाच्या ?

**भाऊसाहेब** : हे जग तरी काय आहे ? स्वप्नच नाही का हे ? आज आहे—उद्या नाही, दिसतं तोपर्यंत खरं म्हणायचं, डोळे झाकले की साराच अंधार. कल्पनेची चित्रं रेखाटून त्या अंधाराच्या मूर्ती घडवायच्या अन् त्या आपणच निर्माण केलेल्या मूर्ती कवटाळून नवं जग निर्माण झालं अशी कल्पना करायची. ती ही नव्या जगाची मूल्यं तुला एव्हा कळायची नाहीत. ती कळायला पुरुषाचं हृदय पाहिजे—स्वाभाविक कठोरपणा पाहिजे—विधात्याची

निर्माणशक्ती त्या कठोरपणात असते. कोमलतेच्या क्षेत्रात बीजाचा विकास होतो, पण त्या विकासाचं मूळ त्या बीजाच्या कठोरपणात कसं असतं याची पुरेपूर कल्पना आल्याशिवाय पुरुषाच्या पौरुषाचा मोठेपणा चांगलासा पटायचा नाही. त्या पौरुषाच्या कामगिरीतच—[ घंटा वाजते. ] कोण आलं पाहा पाहू.

**सुमित्रा :** पुन्हा आत जाऊन बसायचंय वाटतं ?

**भाऊसाहेब :** आधी पाहा म्हणतो ना.

[ सुमित्रा दार उघडते. कमलेश एकदम आत घुसतो. कमलेशचा पोषाख इंग्रजी पद्धतीचा अपटुडेट असला तरी त्यात गबाळेपणाच जास्त दिसून येतो. सदा हसतमुख, गोड बोलणारा, कधीच न रागावणारा, असा तो एक तरुण लेखक आहे. ]

**कमलेश :** काँग्रॅट्स् भाऊसाहेब काँग्रॅट्स् !

**भाऊसाहेब :** कसले काँग्रॅट्स् ?

**कमलेश :** तुम्ही अध्यक्ष निवडून आलात !

**भाऊसाहेब :** कोण ? मी ? थट्टा करतोस वाटतं माझी ? यंदा बाबासाहेब निवडून यायचे हे अगदी निश्चित आहे.

**कमलेश :** असं मलासुद्धा वाटलं होतं. पण त्यांना तुमच्या पंचमांशसुद्धा मतं पडली नाहीत.

**भाऊसाहेब :** छेः ! असं होणं शक्यच नाही. कुणीतरी बनवलं वाटतं तुला ?

**कमलेश :** मीच होतो मुळी मतं मोजायला—कसं काय वहिनी, काय वाटतं आता ?

**सुमित्रा :** मला काय वाटायचं ? वृक्षावरच्या अनेक वेलीतली मी एक वेल आहे.

**भाऊसाहेब :** ऐकलंस कमलेश, हा विनय आहे बरं हिचा. या अध्यक्षपदाची मी कधीच पर्वा केली नाही. पण ही मात्र पुन्हा पुन्हा म्हणे—हं, हं, समजलो, पण या कमलेशला सांगायचं नाही तर सांगायचं कुणाला ? तो अभिमान आहे तुझा ! ( कमलेशला ) स्त्री म्हणजे पुरुषाच्या अभिमानाची मूर्ती आहे. पुरुष जो एवढा झगडत असतो तो त्या स्त्रीच्या अभिमानासाठी. स्त्री नसती तर

पुरुष चैतन्यहीन झाला असता—

**सुमित्रा :** स्त्री नसती तर पुरुष मुळी झालाच नसता. अन् त्या पुरुषाला कुणी पुरुषसुद्धा म्हटलं नसतं.

**भाऊसाहेब :** अग ही लक्षणा आहे. तुला नाही कळायचं ते. खरंच का बाबासाहेब निवडून आले नाहीत ?

**सुमित्रा :** खरंच का हे निवडून आले ?

**कमलेश :** आताच मी सांगितलं ना ! मी स्वतः मतं मोजायला होतो. अगदी प्रचंड बहुमतानं भाऊसाहेब निवडून आले. खोटं कशाला बोलू ? क्षणभर मला वाईट वाटलं.

**सुमित्रा :** शाबास ! हे निवडून आले म्हणून ?

**कमलेश :** छे, छे ! मला वाईट वाटलं ते बाबासाहेब पडले म्हणून. पण त्यांना कुठं आहे त्याची पर्वा ?

**सुमित्रा :** अन् यांना तरी कुठं आहे त्याची पर्वा ?

**कमलेश :** अन् तुम्हांला ?

**सुमित्रा :** खरं सांगू ?

**भाऊसाहेब :** सांग, सांग ना !

**सुमित्रा :** अगदी मन मोकळं करून सांगू ?

**भाऊसाहेब :** अगदी मन मोकळं करून सांग. एवढासुद्धा संकोच धरू नकोस.

**सुमित्रा :** बरं का कमलेश, मी एक गृहिणी आहे, या संसाराचा सारा भार वाहायचा असतो मला—त्या नात्यानं मी पाहते, तसं पाहू लागलं की मला वाटू लागतं --( थांबते. )

**भाऊसाहेब :** सांग ना.

**सुमित्रा :** वाटतं, की मला मोठा आनंद झालाय. आता तेवढीच पुस्तकं जास्त खपू लागतील, तेवढेच जास्त पैसे घरी येतील अन् मीसुद्धा मग ठळकसे दोन दागिने करून आणीन. पण दुसऱ्यांदा असं वाटतं—असा एक प्रश्न येतो समोर—हा कुणाचा जय झाला ?

**कमलेश :** खरंच, कुणाचा जय झाला ?

**भाऊसाहेब :** सांग ना—कुणाचा ?

**सुमित्रा :** स्त्रीजातीच्या वैऱ्याचा !

**कमलेश :** हे वैरी ? भाऊसाहेब स्त्रीजातीचे वैरी ?—

[ घंटा वाजते. दार उघडण्यासाठी सुमित्रा जाते आहे तोच अर्धवट उघडे राहिलेले दार पाहून ते पुरे उघडून हातात हार घेऊन सुषमा प्रवेश करते. सुमित्रा समोर येत असलेली पाहून घाबरून थांबून ' अगबाई ! ' म्हणून मोठ्याने ओरडून दाराशीच थांबते. ]

**सुमित्रा :** या, या ! काही भीती नाही आता. तो अवतार गेलाय. माझ्या हातचं ते हत्यार पडून राहिलंय तिकडे कोपऱ्यात. या तो हार घेऊन ! एकट्याच का आलात ? आणखी अशा तुमच्यासारख्याच शेपन्नास पोरी बरोबर घेऊन का नाही आलात ? या. हे पाहा इथे उभे आहेत. घाला ना तो हार त्यांच्या गळ्यात !

**सुषमा :** गळ्यात ? किती वेड्या आहात तुम्ही ! गळ्यात का हा हार घालायचा ? हा हार गळ्यात घातला तर गुलामगिरी येईल ना माझ्या कपाळी ? हा हार असा मी —( भाऊसाहेबांजवळ येऊन त्यांच्या पायांवर हार ठेवते. ) या माझ्या हृदयवल्लभाच्या चरणांवर अर्पण करणार.

**भाऊसाहेब :** ऐकलंस कमलेश ? पाहिलंस ? स्त्रीजातीचं हे वास्तव स्वरूप पाहिलंस ? निर्भय बालिके, मी तुझं अभिनंदन करतो.

**सुषमा :** पुरुषाच्या स्कंधावर मान टाकून निर्धार राहण्याचा स्वातंत्र्याचा मार्ग स्त्रीजातीला दाखवणाऱ्या शब्दसृष्टीच्या ईश्वरा, सरस्वतीच्या पुत्रा,—

**तुझ्या पायि राया मी ही वाहिली रे काया**
**कशी जिवलग जीवा लाविलीस माया**
**प्रियरमणी मन हंसा**
**ललितकला कलहंसा**
**प्रणय मधुर रसवंती मोहवी जिवा या**
**येई रे विहंगमा**
**दावि नयन नीलिमा**
**का तुझीच रे सुषमा लाविशी झुराया**

मी मरणी मरते रे
तुज भवती फिरते रे
तुडव तरी पायदळी आपुलीच छाया ॥

—पडदा—

# प्रकरण दुसरे

## शिखरावरून

[ गिरगाव टापूतील मध्यम वस्तीच्या भरगच्च चाळीतील तिसऱ्या मजल्यावरील एक डबल-रूमच्या जाग्यातील एक खोली. रंगभूमीच्या मागल्या बाजूला खोलीबाहेर जाण्याचा दरवाजा आणि त्याच्याच बाजूला खिडकी. त्या दोहोतून बाहेरची गॅलरी दिसते. बाहेरून येणाऱ्या व्यक्ती या गॅलरीतूनच येतात. गॅलरीच्या मागे रस्त्यावरच्या पलीकडची चाळ दिसत आहे. उजव्या बाजूला दुसऱ्या खोलीत जाण्याचा दरवाजा आहे. खोलीत एका कोपऱ्यात लिहिण्याचे टेबल, जवळ एक खुर्ची आणि टेबलावर प्रकाश पडेल असा भिंतीचा विजेचा दिवा. दुसऱ्या बाजूला एक पुस्तकाचे कपाट, त्या कपाटाशेजारी एक वेताची आरामखुर्ची, घडी करून भिंतीला टेकून ठेवलेल्या तीन चार लाकडी बैठ्या खुर्च्या—

पडदा वर जाताच हातात एक कागद घेऊन आतल्या खोलीतून सुलभा बाहेर येते. गॅलरीत जाऊन डोकावून पाहते. आत येऊन टेबलावर असलेल्या घड्याळाकडे पाहात आपल्याशीच पुटपुटते, ' अजून कसे आले

नाहीत ?' पुन्हा बाहेर गॅलरीत जाते, तोच दुसऱ्या बाजूने राजाभाऊ येत असल्याचे खिडकीतून दिसते. ]

**सुलभा** : आले वाटतं ?

**राजाभाऊ** : ( दारातच ) कोण ? तुझे बाबा होय ?

**सुलभा** : म्हणजे ? तुम्ही गेला नाहीत वाटतं स्टेशनवर ?

[ राजाभाऊ आत येतो. टोपी, कोट काढून खुंटीवर ठेवतो आणि नंतर टेबलाजवळच्या खुर्चीवर बसतो. त्याच वेळी सुलभा बोलत असते. ]

**सुलभा** : काय म्हणावं ? किती माणसं गेली असतील स्टेशनवर ! पण आम्ही घरची माणसं मात्र तिथं नाही ! मी जाते म्हटलं—

**राजाभाऊ** : मग का नाही गेलीस ?

**सुलभा** : वाः ! तू जाऊ नकोस—मीच जातो असं सांगितलं मला. अन् आता हे असं म्हणता ? छान !

**राजाभाऊ** : चहाला ठेव ना—पाहतेस काय अशी ? खरं सांगू, मी विसरलो. फार काम होतं आज ऑफिसात—( हसतो. ) अन् हे पाहा, एक गंमत सांगायचीय तुला. ती सांगितली की हा तुझा राग जाईल आपोआप. पण आधी चहा हवा.

**सुलभा** : चहा मिळायचा नाही ! बाबा म्हणतील—

**राजाभाऊ** : काय बाबा म्हणतील ? अग पन्नास माणसं गेली असतील त्यांना रिसीव्ह करायला, तिथं तू कोण अन् मी कोण ? सारे भगत गोळा झाले असतील त्यांच्या भोवती. गेलो असतो आपण तर ढुंकूनसुद्धा पाहिलं नसतं त्यांनी आपल्याकडे. येतील ते आपोआप घरी—चहा ठेव ना आता.

**सुलभा** : मी सांगून ठेवते, चहा मिळायचा नाही. ढुंकून पाह्यलं नसतं म्हणे ! नसतं पाह्यलं, पण आता बाकीचे लोक काय म्हणतील ? नातं नाही, गोतं नाही अशी माणसं जातील रिसीव्ह करायला अन् खुद्द मुलगी आणि जावई तेवढे गैरहजर. हूंः, अन् चहा मागता !

**राजाभाऊ** : मला वाटतं, त्यांची गाडी चुकली आज. आले असते तर इतक्यात येऊन पोचले असते. हे बघ, तुला गंमत सांगेन म्हटलं ना मी—त्या गंमतीपायीच गेलो नाही मी स्टेशनवर. ( उठून खुंटीवरच्या कोटाच्या

खिशातून एक पाकिट काढतो. ) हे पाहिलंस ? वाचशील तर नाचू लागशील. अजून वर्तमानपत्रांना सुद्धा कळलं नाही. पोस्टात टाकलं नाही, स्वतः घेऊन आलो, त्यापायीच उशीर झाला. पाहिलं तो गाडीची वेळ टळून गेली. म्हटलं इथंच थक्क करून टाकावं तुम्हांला—

**सुलभा** : काय आहे ते ?

**राजाभाऊ** : नाचशील नुसती वाचलंस तर.

**सुलभा** : [ डोकावून पाहून वाचायचा प्रयत्न करते. तो मागे लपवतो. ] बाबांच्या नावचं दिसतंय्.

**राजाभाऊ** : मग काय वाटल तुला ?

**सुलभा** : म्हटलं प्रमोशन मिळालं की काय ! कव्हर दिसतंय युनिव्हर्सिटीचं.

**राजाभाऊ** : हो. युनिव्हर्सिटीचंच कव्हर आहे ते. अन् प्रमोशन पण आहेच.

**सुलभा** : कसलं ? कुणाला ?

**राजाभाऊ** : मला नव्हे—तुझ्या बाबांना.

**सुलभा** : बाबांना ? बाबा काही तुमच्या कचेरीत नोकर नाहीत.

**राजाभाऊ** : हं. हं. तशीच गंमत आहे !

**सुलभा** : पाहू बरं काय आहे ते.

**राजाभाऊ** : आणखी दोन तासांत साऱ्या मुंबईला कळेल. मग काही मजा नाही त्यात.

**सुलभा** : असं काय ? पाहू म्हणते ना !

**राजाभाऊ** : तसं नाही मिळायचं, आधी चहा हवा.

**सुलभा** : पुन्हा सांगते, ते काय आहे ते पाहिल्याशिवाय चहा मिळायचा नाही.

**राजाभाऊ** : अन् मी पुन्हा सांगतो, चहा मिळाल्याशिवाय ते काय आहे ते पाहायला मिळायचं नाही.

**सुलभा** : बरं तर, पाहूच. ( आराम खुर्चीवर जाऊन बसते. ) मला कळतात ही ढोंगं. स्टेशनवर जायचं नाही, बाबांना भेटायचं नाही, त्यांना घेऊन यायचं नाही घरी अन् म्हणायचं, ( तोंड वेंगाडून ) गम्मत आहे—[ दोघे क्षणभर स्तब्ध. नंतर सुलभा उठून राजाभाऊकडे जाते. ] दाखवायचा म्हटलं तो

लखोटा—ऐकलं ? बहिरे झाले वाटतं कान ? देता की नाही बऱ्या बोलानं ?

**राजाभाऊ :** आधी चहा पाहिजे---

**सुलभा :** इराण्याच्या दुकानात आहे चहा.

**राजाभाऊ :** युनिव्हर्सिटीच्या ऑफिसात आहे लखोटा.

**सुलभा :** असं काय बरं हे. द्या म्हणते ना ! माझ्या गळ्याची शपथ आहे.—जीभ कशाला चावता ? ते जीभ चावायचे, सुत दातात धरायचे दिवस गेले आता.

**राजाभाऊ :** अन् ते शपथ घालायचे दिवसही गेले आता म्हणावं. रोज शपथा घेऊन मोडताहेत पण कोण मरत नाहीत.

**सुलभा :** हे काय बरं असं ? द्या ना पत्र –द्या ना—द्या-द्या-द्या नाही देत ?

[ ती झोंबून लखोटा काढून घ्यायचा प्रयत्न करते. तो लपवायचा प्रयत्न करतो. शेवटी ती लखोटा काढून घेते आणि धावत जातच लखोटा उघडून खोलीच्या दुसऱ्या टोकाजवळ जाऊन वाचते. तिरप्या नजरेने पाहात राजाभाऊ हसतो. ]

**सुलभा :** ( वाचून ) डॉक्टर ? बाबा डॉक्टर ? ( राजाभाऊकडे येऊन ) अहो, डॉक्टरचे जावई, तोंड नव्हतं का सांगायला ? येताच सरळ सांगितलं असतं तर काय बिघडलं असतं ?

**राजाभाऊ :** आहे ना गंमत ?

**सुलभा :** बाबा डॉक्टर अं—( राजाभाऊकडे पाहात राहते. )

**राजाभाऊ :** पाहतेस काय ? नोकर म्हणतात मला—ओझ्याचा बैल—पण त्या बैलाचीच अक्कल फळाला आली ही. केवढं आकांडतांडव केलं तेव्हा—

[ बाहेरून बाबासाहेबांचा आवाज--' अरे, इकडे घेऊन ये ते सामान ' ]

**सुलभा :** बाबा आले वाटतं. [ बाबासाहेब येतात. ] आलात बाबा ? मला येता आलं नाही स्टेशनवर.

**बाबासाहेब :** कशाला यायला हवं स्टेशनवर ? खूप आले होते मला सतावायला—[ हमाल सामान आणून आत ठेवतो. ] सुले, इकडे बाजूला ये पाहू. ( हळूच ) दोन आणे दे त्या हमालाला.

[ सुलभा डोळ्याच्या खुणेने राजाभाऊला सांगते. राजाभाऊ खिशात हात घालून एक आणा हमालाला देतो. ]

हमाल : एकच आणा ? सत्रा जिने चढून आलो वर.

बाबासाहेब : दोन आणे दे त्याला.

राजाभाऊ : कसले दोन आणे ? रस्त्यावरून ही बॅगवळकटी आणली एवढंच ना ?

बाबासाहेब : हे हार कशाला आणलेस ? नाहीतर असं पाहा ए, हे हार घेऊन जा तू. विक कुणाला तरी. चांगले दोन दोन रुपये किंमतीचे आहेत. सहज चार आठ आणे येतील यांचे—

सुलभा : वाः ! त्याला का द्यायचे हे हार ? किती छान गुलाब आहेत. अन् रिबन देखील आहे सुंदर. हार हमालाला का द्यायचे ? [ हार उचलून घेऊन आत जाते. ]

हमाल : द्या ना रावसाहेब आणखी एक आणा.

बाबासाहेब : दे ना राजा त्याला एक आणा. [ राजाभाऊ वाकडे तोंड करून एक आणा त्याला देतो. हमाल जाऊ लागतो. ]

राजाभाऊ : अरे हे आत नेऊन ठेव.

हमाल : आत नेऊन ठेव म्हणे ! काय ऐदी असतात हे पांढरपेशे ! [ असे म्हणत सामान आत ठेवून बाहेर निघून जातो, तोच वेणीत गुलाबाची फुले खोचीत खोचीत सुलभा लखोटा घेऊन बाहेर येते. ]

सुलभा : बरं का बाबा,—

बाबासाहेब : बाबा गेला उडत. ( खिशातून पाकीट काढून उघडून दाखवीत ) हे पाहा, नुसते दोन पैसे राहिलेयत शिल्लक. ( हसून ) तसा दोनपैसे बाळगून आहे मी—( त्रासून ) अन् हे हार घालतात लेकाचे. दोन दोन रुपये पडले असतील प्रत्येकाला. हार घालायच्या ऐवजी दोन दोन रुपयेच दिले असते तर दोन आण्यासाठी या राजापुढं कशाला हात पसरावा लागला असता ?

राजाभाऊ : आता दोन आणे जाणारच होते माझे—हिच्या वेण्यांसाठी. तसं पाहिलं तर आता चार दोन दिवसांची बेगमी झालीय वेण्यांची.

सुलभा : थांबा आधी. असं पाहा बाबा, आज तुम्ही कोण आहात असं तुम्हांला वाटतं ?

बाबासाहेब : मी गाढव आहे असं वाटतं मला.

**सुलभा** : असं रागवायला काय झालं ? साहित्यपरिषदेचे अध्यक्ष होऊन परिषद गाजवून आलात—

**बाबासाहेब** : हो हो गाजवून आलो. बरं मग ?

**सुलभा** : असं काय करता बाबा ? सारी वर्तमानपत्रं एकमुखानं तारीफ करताहेत—एकानंसुद्धा कुणी तेढा सूर काढला नाही—कधी झालं होतं का असं परिषदेच्या इतिहासात ?—( जरा थांबून ) बरं का बाबा, अन् इकडे काय झालं माहीत आहे का ?

**बाबासाहेब** : टाच आणली वाटतं घरवाल्यानं ?

**सुलभा** : असं काय झालंय तुम्हांला आज ? फार मोठी गंमत झालीय इकडे—मोठ्ठी मोठ्ठी गंमत झालीय.

**बाबासाहेब** : पन्नासांचे साठ झाले राजाला ?

**राजाभाऊ** : अजून तीन वर्षे लागतील साठ व्हायला. पण ही गंमत मोठी और आहे. आताच सिनेटची बैठक संपली. अजून वर्तमानपत्रांना कळलं नाही—

**बाबासाहेब** : काय झालंय ? काय केलं सिनेटनं ?

**सुलभा** : मोठ्ठीच तरवार मारलीय सिनेटनं.

**बाबासाहेब** : असल्या कोणत्या प्रकरणी मुंबईच्या म्हातारीचा मुडदा जागा झाला ?

**सुलभा** : ( लखोटा दाखवून ) हे पाहा.

**बाबासाहेब** : हे काय ? इन्कमटॅक्सचं वॉरंट आहे की काय ? दमडी नाही मिळत—भाडं दिलं नाही तीन महिने—अन् म्हणे इन्कमटॅक्स भरा.

**सुलभा** : आधी नीट बघा तर खरं.

**राजाभाऊ** : मी घाई केली. आम्ही कारकून करू ते व्हाईस चॅन्सेलरलासुद्धा व्हायचं नाही.

**बाबासाहेब** : काय लावल्यास रे ध्वजा कारकुना ? ( सुलभा ) दे पाहू तो लखोटा इकडे. काय म्हणतो म्हातारीचा मुडदा ?—

**सुलभा** : आता असं काही म्हणायचं नाही बरं आमच्या युनिव्हर्सिटीला. म्हातारी असली तरी आता जागी झालीय.

**बाबासाहेब :** ( लखोटा उघडून पाहून, पुन्हा कागद लखोट्यात घालून बाजूला फेकीत ) हं: ? एवढंच ? हीच का ती तुझी गंमत ?

**सुलभा :** एवढंच !

**राजाभाऊ :** एवढंच ! ! ( सुलभेला ) आता ऐक, एवढंच म्हणताहेत.

**बाबासाहेब :** मग काय म्हणू ? मोठे उपकार झाले म्हणू ? तेवढ्यानं होईल समाधान तुझं ? ( उभा राहून—हात जोडून ) मोठे उपकार झाले जावईबुवा. मी माझी मुलगी दिली तुम्हांला—तुम्ही एक पदवी आणून दिली आम्हांला ! तीन वर्षं झगडलो युनिव्हर्सिटीबरोबर, पण इन्टर आर्ट्सचा आखाडा काही उलटता आला नाही. आता हे डॉक्टरेट मिळवून दिलंत—मोठे आभार झाले आपले !—( आरामखुर्चीवर जाऊन बसत ) आता चहा आण सुले. घाण झालेयत हे कपडे, एकदा स्नान केल्याशिवाय बरं वाटायचं नाही.

**राजाभाऊ :** ( सुलभेला ) जा, आता तरी चहा आण.

[ राजाभाऊ टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन बसतो. सुलभा आत जाते. एक क्षणभर दोघेही बोलत नाहीत. ]

**बाबासाहेब :** रागवलास होय राजा ? हे बघ, कशातच मोठेपणा वाटत नाही मला. सारं काही भरपूर होऊन गेलंय. पण नुसत्या या मानाच्या पानांनी काही पोट भरत नाही. ब्रिटिशांचं राज्य आलं, त्याबरोबरच हा पदवीचा प्रपंच थाटला. काय जातं कोरडी पदवी द्यायला ? पण ही पदवी संभाळायची कशी ? सरंजाम नको का या पदवीबरोबर ? तशी काही तैनात देणार आहे का तुझी युनिव्हर्सिटी ?

[ आतून स्टोव्हचा आणि कपबशांचा आवाज ऐकू येत आहे. ]

**सुलभा :** ( आतून ) दोन कप चहा हवा ना तुम्हांला बाबा ?

**राजाभाऊ :** मला एक कप पुरे.

**बाबासाहेब :** दोन कप चहा हवा मला ! इराण्याच्या दुकानात गेलो असतो तर दोन आणे टिचावे लागले असते आत्ताच. मोठे उपकार आहेत तुझे राजा. पदवीच्या उपकारापेक्षा हे उपकार फार मोठे आहेत—[ राजाभाऊ अस्वस्थपणे आतल्या दरवाजाकडे डोकावून पाहात असतो. ] अरे येतोय चहा. इतका उतावीळ कशाला होतोस ?

**राजाभाऊ :** मोठ्या थाटात झाली नाही परिषद ?

**बाबासाहेब :** हो तर. मोठ्या थाटात झाली. खूप मेजवान्या झोडल्या, चहा-पार्ट्या झाल्या—सारखा मोटारीतून हिंडत होतो–पाय लावला नाही जमिनीला—पण उद्या कोर्टात जायचं आहे त्यासाठी ट्रॅमचे दोन आणे घेतले पाहिजेत तुझ्याकडून—पन्नास रुपयेवाल्या एका कारकुनाकडून ! मोठी गंमत आहे नाही ?

[ सुलभा एक टी-पॉय आणून बाबासाहेबांसमोर ठेवते. दुसरी एक खुर्ची त्याच्याजवळ ओढून ठेवते आणि पुन्हा आत जाते. ]

**बाबासाहेब :** बैस ना राजा.

**राजाभाऊ :** आणखी काय काय गंमती झाल्या तिथं !

**बाबासाहेब :** वाचलीस ना वर्तमानपत्रं ? खूपखूप लिहिलंय त्यांनी. मला सुद्धा माहीत नव्हत्या अशा पुष्कळ गोष्टी लिहिल्या आहेत या वर्तमानपत्रांनी. त्यापेक्षा मी काय सांगणार अधिक ?—[सुलभा ट्रेतून तीन चहाचे पेले आणून ठेवते आणि बाजूला उभी राहते. ] मारे बोलत होतो जोरजोरानं—पण सारं लक्ष होतं इकडे. घरवाल्यानं टाच आणली तर म्हटलं आमच्या राजाराणीची इकडे तारांबळ उडेल—( सुलभेला ) काय राणी, आला होता का तो इकडे ?

**सुलभा :** कोण ?

**बाबासाहेब :** घरवाल्याचा मुनीम. नोटीस लावली का त्यानं ?

**सुलभा :** नाही अजून. नुसता तंडावून गेला.

**बाबासाहेब :** ( चहा घेत घेत ) उद्या तो आला इथं, की हा युनिव्हर्सिटीचा खलिता मार त्याच्या दातांवर.

[ राजाभाऊ सुलभाकडे व सुलभा त्याच्याकडे अर्थपूर्ण दृष्टीने पाहतात. राजाभाऊ चहा घेऊन कोट चढवतो. ]

**बाबासाहेब :** काय रे, कुठं चाललास ? पारा उतरला नाही वाटतं खाली ? अरे, हे चालायचंच. जगाच्या दृष्टीनं मोठा कृतघ्न माणूस आहे मी—अन् ते एका अर्थी खरं आहे. कशाचंच महत्त्व वाटत नाही मला. या जगात महत्त्व काय ते एकाच गोष्टीचं—दमड्या ! दमड्या पाहिजेत !—अन् त्या तर नाहीत माझ्याकडे. ( मोठ्याने हसतात ) अन् आता ही पदवी मिळाली आहे.

उद्यापासून सारे लोक मला ' डॉक्टर डॉक्टर ' म्हणून हाक मारणार—दुःखावर डागण्या देणार. असं आहे हे ! मला आनंद व्हावा म्हणून तू खटपट केलीस—ही पदवी मिळाली—पण झालं काय ? माझ्या यातना मात्र वाढतील आता. चाललास कुठं ? थांब ना !

**राजाभाऊ :** नाही—जरा काम आहे मला.

**बाबासाहेब :** कळलं तुझं काम,—काढून ठेव तो कोट. अन् तू ग, तुझी का दातखिळी बसली ? फुकट गुलाब मिळाले ना डोक्यात घालायला ? एवढंच हे वैभव तुझ्या बापाघरचं !

**सुलभा :** स्नान करणार आहात ना ?

**बाबासाहेब :** हो खरंच, विसरलो. हे असं होतं माझं. पाणी आहे ना नळाला ? नाहीतर पाणीसुद्धा नसायचं आमच्या घरात.

**सुलभा :** चला आता उठा, सारी तयारी करून ठेवलीय तिथं नळावर.

[ कपडे काढीत काढीत बाबासाहेब आत जातात आणि आतला दरवाजा लावून घेतात.]

**राजाभाऊ :** ( कोट काढून ठेवून ) काय ? काय म्हणतात पिताजी. ऐकलंत ना ?

**सुलभा :** मन पाहिलं पाहिजे माणसाचं—बोलणं ऐकू नये. आग पेटली आत, की ठिणगी उडायचीच एखाददुसरी. इतकी वर्षं पाहतेय मी—एवढी पुस्तकं लिहिली, पण अजून जसं होतं तसंच चाललंय. बिचाऱ्या आईनं जन्मभर हाल काढले—गेली ती सुटली !—पण तेच लागून राहिलंय त्यांच्या मनाला. आज आई असती तर केवढा आनंद झाला असता तिला ! केवढा अभिमान होता तिला बाबांच्या लेखनाचा ! असल्या या दारिद्र्यातसुद्धा तिनं तोंडभर हसून बाबांना हसवलं असतं. तेच आठवलं वाटतं त्यांना आज.

**बाबासाहेब :** ( आतून आंघोळ करीत असता ) हो. हो. तेच आठवलं. गप्प बैस. मला आंघोळ करू दे सुखानं.

[ राजाभाऊ पुन्हा टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन बसतो. सुलभा त्याच्या शेजारी जाऊन उभी राहते. ]

**सुलभा :** ऐकलंत ? दुःख झालं माणसाला की रागाचा भलता आव आणून

तो फसवू पाहतो दुसऱ्याला. मोठी माणसं रडत नाहीत, नुसती रागावतात— आपल्या नशिबावर नव्हे, जगावर रागवतात—दुसऱ्यावर रागावतात.

**राजाभाऊ :** कशाला ही फसवणूक ? अन् ही म्हणे मोठी माणसं ! आम्ही क्षुद्र माणसंच बरी. यःकश्चित कारकून मी—एवढ्या उलाढाली केल्या, पदवी मिळवून दिली, त्याचं हे बक्षिस.

**सुलभा :** बक्षिसाच्या आशेनं का आपण एवढं केलं ? नाही ना ? मग राग कशाला धरायचा त्याचा ?

**राजाभाऊ :** कोण म्हणतो बक्षीस द्या म्हणून ? पण निदान चार गोड शब्द तरी बोलायचे ! सदान्‌कदा प्रत्येकावर तोंडसुख घ्यायचं—प्रत्येकाला छेडायचं—नुसती व्यंगं तेवढी काढायची—काय वाटेल माणसाला ?

**सुलभा :** स्वभावच आहे ना तसा त्यांचा ? त्याला आता काय उपाय ?

**राजाभाऊ :** त्यांचा स्वभाव त्यांच्या जवळ, मला त्याचं काय होय ? पण तो त्रास मी का सोसू ? तुझ्या आग्रहामुळं इथं राहिलो पण सुखाचा क्षण मिळत नाही मला. शिवाय पदराला चाट लागते ती वेगळीच—

**सुलभा :** ( त्याच्या तोंडावर हात ठेवून ) उगी म्हणते ना. ऐकू येईल ना त्यांना.

**राजाभाऊ :** ( तिचा हात लोटून ) ऐकू देत. आता अगदी डोक्यावरून पाणी गेलं. एवढं मी केलं त्याचीसुद्धा कदर नाही—[ बाहेरून ' डॉक्टर, अहो डॉक्टर ' अशी हाक मारीत प्रभाकर येतो.]

[ प्रभाकर हा एक तिशीच्या आतला तरुण लेखक आहे. पोषाख अप-टु-डेट, दिसण्यात हुषार, बोलताना हातवारे करण्याची सवय जास्त.]

**प्रभाकर :** ( आत येऊन ) कुठं आहेत डॉक्टर, राजाभाऊ ? आधी कुणी आला नाही ना ? असा जीव टाकीत आलो. म्हटलं पहिलं अभिनंदन माझ्याकडचं झालं पाहिजे. कुठं आहेत बाबासाहेब—नव्हे डॉक्टर बाबासाहेब ?

**राजाभाऊ :** आताच आले ते. स्नान करताहेत आत, पण पहिला मान काही तुम्हाला मिळाला नाही.

**प्रभाकर :** मग कुणाला ?

**राजाभाऊ :** मला !

**प्रभाकर :** अंः—तुम्ही घरची माणसं. घरच्या माणसाचं अभिनंदन काही हिशेवी धरायचं नाही.

**राजाभाऊ :** का बरं ? माझं बिऱ्हाड स्वतंत्र असतं तर नसतो का आलो मी धावत ?

[ बाबासाहेब दरवाजा उघडून सदरा घालीत घालीत बाहेर येतात. ]

**बाबासाहेब :** कोण ? प्रभाकर ? तू कुठं इकडे ?

**प्रभाकर :** वाः वाः ! म्हणजे हे काय ? अभिनंदन करायला आलोय ना मी !

**बाबासाहेब :** ( एक खुर्ची ओढून घेऊन बसतो आणि दुसरी खुर्ची प्रभाकरला देतो. ) बैस ना. अभिनंदन करायला आला होतास होय ? कसलं अभिनंदन करणार आहेस ?

**प्रभाकर :** कसलं म्हणजे ? डॉक्टरेट दिलं ना तुम्हांला ?

**बाबासाहेब :** मग त्यात कसलं अभिनंदन ? एवढं काय झालं विशेष त्यात ? मी नालायक होतो डॉक्टरेटला !

**प्रभाकर :** हे काय म्हणणं ! लायक होता म्हणूनच ही पदवी दिली युनिव्हर्सिटीनं—अन् म्हणूनच आपलं अभिनंदन करायचं.

[ हे भाषण चालले असता राजाभाऊ सुलभेच्या कानात काही सांगून कपडे करून मुकाट्याने निघून जातो. सुलभा लिहायच्या टेबलाला टेकून ऐकत उभी राहते. ]

**बाबासाहेब :** असं होय ? हे नव्हतं मला माहीत. पण असं सांग मला प्रभाकर, ही बातमी ऐकून तुला मनापासून आनंद झाला ?

**प्रभाकर :** वाः वाः ! म्हणजे हे काय म्हणणं ? आनंद झाल्याशिवाय का अभिनंदन करायला आलो ?

**बाबासाहेब :** साहित्यपरिषदेचा अध्यक्ष व्हायला नालायक असलेल्या माणसाला युनिव्हर्सिटीनं डॉक्टरेट देणं योग्य होईल का ?

**प्रभाकर :** हे अगदी उगीच बोलताहात हं बाबासाहेब. पक्षाभिमानाला बळी पडून केव्हा केव्हा माणूस काहीतरी लिहून जातो. पण ते तेवढ्यापुरतंच पाहायचं.

**बाबासाहेब :** तेवढ्यापुरतंच म्हणजे रे ! तू उघड उघड तसं लिहिलंस,

हजारो उदाहरणं दिलीस, माझी पुस्तकं कवडीमोलाची ठरवलीस—मग कवडी किंमतीचं लेखन करणाऱ्या माणसाला डॉक्टरेट देणाऱ्या युनिव्हर्सिटीला पायपोस मारायच्या ऐवजी अभिनंदन करायला येतोस माझं ?

**प्रभाकर** : ( हसायचा प्रयत्न करीत ) ते आता विसरून चला. झालं गेलं होऊन गेलं. वादाच्या भरात गेलो लिहून काहीतरी. ईर्ष्या असते ना ?

**बाबासाहेब** : पण हजारो लोक वाचून गेले ना तो तुझा लेख ?

**प्रभाकर** : पण शेवटी तुम्ही झालाच की नाही अध्यक्ष ? कुठं काय परिणाम झाला माझ्या लिहिण्याचा ? हे असं चालायचंच बाबासाहेब. एरव्ही आम्ही केवढी तारीफ करतो तुमची—खासगी बैठकीत. ते जाऊ दे आता. उद्या सभा घेणार आहे अभिनंदनाची—

**बाबासाहेब** : हे आता ढोंग केलंस तेवढं पुरे झालं. कुणी नको माझं अभिनंदन करायला. काही पोट भरायचं नाही माझं या अभिनंदनामुळं.

**प्रभाकर** : वाः वाः ! असं कधी झालंय ? तुम्ही काय वाटेल ते म्हणाल, पण आमचं काही कर्तव्य म्हणून आहे ना ?

**बाबासाहेब** : अन् माझे लेख कवडी किंमतीचे ठरवताना कुठं रे गेलं होतं तुझं कर्तव्य ?

**प्रभाकर** : आता ते कशाला काढता ? मी क्षमा मागतो हवी तर. पण उद्या अभिनंदनाची सभा झालीच पाहिजे. काय सुलूताई, तुमचं काय म्हणणं ?

**सुलभा** : मला नाही काही कळत यात. ते तुम्ही आहात नि ते बाबा आहेत—काय वाटेल ते करा.

**प्रभाकर** : असं कसं होईल ? तुम्ही तर अवश्य हजर राहिलं पाहिजे त्या सभेला.

**सुलभा** : माझा काय संबंध ?

**प्रभाकर** : आमचा काय संबंध ? का सभा भरवणार आहोत आम्ही ? हे सार्वजनिक कार्य आहे. हा नुसता व्यक्तीचा सन्मान नाही—हा मराठी भाषेचा मान आहे. हा विजय आहे या आमच्या महाराष्ट्राचा. मुंबई युनिव्हर्सिटीच्या इतिहासात हे पहिलं उदाहरण आहे. या वेळी जर आम्ही पुढं यायचं नाही, तर यायचं केव्हा ? केवढा अभिमान वाटतो आम्हांला. केवढा आनंद होतोय !

केवढी आशा वाटतेय ! आजवर असं झालं नव्हतं, आता झालं—हे एक उदाहरण झालं मराठी लेखकाची कदर युनिव्हर्सिटी करते हे सिद्ध झालं. एकदा झालं. ते पुन्हा होईल. आमच्यासारख्या तरुण लेखकांना हा एक आशेचा किरण आहे.

**बाबासाहेब :** असं होय ? उद्या तुला डॉक्टर व्हायची आशा आहे म्हणून आज माझं अभिनंदन करतोस, होय ?

**प्रभाकर :** आता तुम्हीच पाहा सुलूताई, मी काय गैर बोललो होतो यात ? पुढच्यांना मोठेपणा मिळाला तर मागच्यांना आशा उत्पन्न व्हावी हे स्वाभाविक नाही का ?

**बाबासाहेब :** अग, त्याला एक कप चहा दे.

**प्रभाकर :** वाः वाः ! नुसता चहाच का ? चांगली बडी पार्टी हवीय आम्हांला. आम्हांला म्हणजे मला एकट्यालाच नव्हे—मुंबईतल्या साऱ्या मराठी लेखकांना.

**बाबासाहेब :** मी टाटाचा वारस आहे असं वाटलं का रे तुला ? ही पार्टी वसूल करण्यासाठी का माझं अभिनंदन करणार आहेस ?

**सुलभा :** खरंच का चहा हवा ?

**प्रभाकर :** चहा कधी कुणी नको म्हटलाय ?

**सुलभा :** मग असं करा, भांडं देते मी—त्या पलीकडच्या इराण्याकडून नाहीतर भय्याकडून पावशेर दूध घेऊन या.

**प्रभाकर :** हो, आणतो की. द्या ना भांडं. [ सुलभा आत जाते. ] हे पाहिलंत बाबासाहेब, सुलूताईला वाटलं मी असलं काम काही करणार नाही. पण इथं मी परका का आहे ? [ सुलभा भांडे आणून त्याच्या हाती देते. ] आत्ता घेऊन येतो पाहा दूध. ( उठून जाऊ लागतो ) काय पडतं पावशेराला ?

**सुलभा :** सांगेल की तो दुकानदार.

**प्रभाकर :** ( खिसे चाचपून पाहात ) मग द्या ना.

**सुलभा :** दिलं की भांडं.

**प्रभाकर :** भांडं नव्हे—( हळूच ) पैसे !

**सुलभा :** इकडे आणा ते भांडं. तसं असतं तर मीच नसते का घेऊन आले.

तुम्हांला कशाला सांगितलं असतं ? [ त्याच्या हातचे भांडे काढून घेऊन सुलभा आत जाते. ]

**बाबासाहेब** : अन् पार्टी मागतोस माझ्याजवळ. एकट्याला नव्हे—तर मुंबईतल्या साऱ्या मराठी लेखकांना. तरी बरंच, की तू सुद्धा एक लेखक आहेस.

[ गोपाळराव घाईघाईने येतो. आल्याबरोबर एकदम बाबासाहेबांचा हात धरून जोरजोराने शेक-हॅन्ड करतो. ]

**गोपाळराव** : किती आनंद झालाय म्हणून सांगू बाबासाहेब ?

**बाबासाहेब** : सांगू नकोस. पैसे आणलेयस का काही ?

**गोपाळराव** : पैसे पैसे म्हणजे काय समजता बाबासाहेब ? असे ओवाळून टाकीन तुमच्यावरून पैसे !

**बाबासाहेब** : टाकू नकोस. टाकायचेच असले तर माझ्या हातात टाक. कुठं तरी टाकू नकोस.

**गोपाळराव** : टाकीन, टाकीन. वेळ येईल तेव्हा तेही देऊन टाकीन.

**बाबासाहेब** : पण केव्हा येणार आहे ही वेळ ?

**गोपाळराव** : ते राहू दे. प्रभाकरपंत, सभा केव्हा घेणार आहात बोला. व्हाईसचॅन्सेलरनाच बोलवा अध्यक्ष म्हणून. लुंगीसुंगी माणसं आणून नाही चालायचं. उगीच नाही प्रभाकरपंत, कसं छान काढलंय पुस्तक ! जॅकेट पाहिलंत ? अमेरिकन पुस्तक वाटलं प्रत्येकाला. इंग्रजी असतं तर नोबेल प्राईझ मिळालं असतं.

**बाबासाहेब** : तुझ्या जॅकेटमुळं ?

**गोपाळराव** : जॅकेटच काय, टाईप, छपाई, कागद, बाईंडिंग—झक्क झालं होतं पुस्तक.

**बाबासाहेब** : पण मी कुठं इकडे यात ?

**गोपाळराव** : ते आहेच हो. हिरा असला तरी कोंदण पाहिजे. कुठं तिळाएवढा हिरा—पण चांगलं बोटभर शंभरनंबरी सोन्याचं कोंदण असल्याशिवाय का कुठं खुलून दिसतं ?

**बाबासाहेब** : अन् त्या तिळाएवढ्या हिऱ्याची किंमत ?

**गोपाळराव :** अहो, ते चाललंच आहे. बिनमोल असतो हिरा—

**प्रभाकर :** हे मात्र अगदी खरं. दोनशे पानांचं माझं पुस्तक पण एक दमडीसुद्धा दिली नाही.

**गोपाळराव :** पण पुस्तक कसं काढलं ? काय ? तुम्ही पाहिलं होतं ना ते बाबासाहेब ? छपाईलाच जातात पैसे, मग द्यायचे कुठून लेखकाला ? पण हे तुम्ही लोक ध्यानात घेत नाही प्रभाकरपंत. प्रसिद्धी केवढी मिळते ? आता हे बाबासाहेब, डॉक्टर झाले, ते त्यांच्या पुस्तकामुळंच ना ? पण त्यांना काय मिळालंय त्या पुस्तकासाठी ?

**प्रभाकर :** ते आताच कळलं मला.

**गोपाळराव :** तसे देतो मी मधूनमधून. नाही असं नाही. एवढा मोठा लेखक—जगवला पाहिजे ना त्याला ?

**बाबासाहेब :** ऐक प्रभाकर, दमडीदुगाणी दिलीय यानं म्हणून जगलोय अजून. मला डॉक्टरेट मिळालं म्हणून जर तुला अभिनंदन करायचं असेल तर ते या गोपाळरावाचं कर. यानं जगवलंय मला. यापूर्वीच मेलो असतो तर कुठलं डॉक्टरेट नि कुठलं तुझं अभिनंदन !

**गोपाळराव :** हे पाहा बाबासाहेब, पहिल्यापासूनच तुमचं चुकत आलंय. कुठंतरी नोकरी करायची पोटापुरती. पुस्तकावर का कधी पैसे मिळतात ?

**बाबासाहेब :** लेखकाला की प्रकाशकाला ?

**गोपाळराव :** असं म्हणू नका बाबासाहेब, आधी भांडवल असावं हाती तेव्हा प्रकाशक होता येतं. प्रकाशकाला मिळतं ते या भांडवलाचं व्याज.

**प्रभाकर :** अन् लेखकाचं नसतं का त्यात काही भांडवल ?

**गोपाळराव :** लेखकाचं कसलं भांडवल ? घेतली लेखणी की लिहिलं. चाललाय लिहीत—चाललाय लिहीत.

**बाबासाहेब :** अन् ते लिहिण्याला काही बुद्धी लागत नाही वाटतं ? काही अभ्यास, काही अवलोकन, काही प्रवास, काही अनुभव—चिंतन एखाद्या विषयचं ?

**गोपाळराव :** ते खरं, पण त्याला काही भांडवल लागत नाही. अर्थशास्त्राच्या दृष्टीनं बुद्धीला काही मोल नाही. बुद्धी म्हणजे पैसा नव्हे. बुद्धी म्हणजे शेतवाडी

नव्हे—जमीनजुमला नव्हे. गहाणविक्री करून बुद्धीवर काही पैसे काढता येत नाहीत. अर्थशास्त्राच्या दृष्टीनं बुद्धीची किंमत शून्य आहे. त्या तुमच्या या शून्याच्या पसाऱ्याला भांडवल घालून आम्ही मोल आणतो, म्हणून तुमची किंमत ! काय ? ते भांडवल वापरण्यासाठी लेखक हवेत म्हणून आम्ही देतो त्यांना काहीतरी.

**बाबासाहेब :** हो जगण्यापुरते.

**गोपाळराव :** हो, जगण्यापुरते. तसं पाहिलं तर लेखकाला अस्वस्थपणा पाहिजे. तळमळ पाहिजे. खळवळ पाहिजे. श्रीमंत झाला तर लेखक स्फूर्ती हरवून बसेल. म्हणून नुसतं जगण्यापुरतं द्यायचं त्याला. जास्त दिलं की मेलाच लेखक. काहीही लेखन व्हायचं नाही मग त्याच्याकडून.

**बाबासाहेब :** ऐकलंस प्रभाकर ?

**गोपाळराव :** तेव्हा काय म्हणत होतो मी—बरं का प्रभाकरपंत, अभिनंदनाच्या सभेचा सारा खर्च मी देईन. पण व्याख्याते मी ठरवीन.

**प्रभाकर :** ते का ?

**गोपाळराव :** ते कळायचं नाही तुम्हांला. बाबासाहेब डॉक्टर झाले पण त्याचं श्रेय सारं मला आहे. ते माझं श्रेय या सभेत गाजलं पाहिजे.

**बाबासाहेब :** हं. ऐकलंस प्रभाकर, म्हणूनच मी म्हणत होतो, की अभिनंदन करायचं तर या गोप्याचं कर.

**गोपाळराव :** छे ! छे ! छे ! छे ! अभिनंदन तुमचंच व्हायला पाहिजे. आम्ही सारे तुमच्या पोटात येतो—

**बाबासाहेब :** तेव्हाच अन्नाशिवाय पोट भरतं माझं ते.

**गोपाळराव :** असं म्हणू नका बाबासाहेब—अशी एक झकास कादंबरी लिहा. त्यात ते तुमचं लैंगिक की कायसं म्हणतात ते पुष्कळसं आलं पाहिजे. खूप मुके, मिठ्या, लुगडीधोतरं सोडून आणलीत तरी देखील चालतील. पण पोरापोरींनी वाचलं–की यंव !–पुन्हा पुन्हा वाचलं पाहिजे त्यांनी. म्हाताऱ्याचा ‘ ओकासा ’ झाली पाहिजे ती कादंबरी. असं काही तरी लिहा. आता डॉक्टर झालात तुम्ही, आता काही हरकत नाही तसं लिहायला. आता कुणाची छाती आहे तुम्हांला नावं ठेवायची ? हा प्रभ्या–माफ करा हं प्रभाकरपंत, हासुद्धा तारीफ करू

लागेल तुमची. ( प्रभाकरला ) कॉलमला पाच रुपये देईन. ( बाबासाहेबांस ) काय ? लिहिता ?

**बाबासाहेब** : सुले, सुले—अग ए सुले, इकडे ये पाहू. [ सुलभा येते. ] आत काय करीत होतीस ?

**सुलभा** : काही नाही.

**बाबासाहेब** : हे आपले आहेत ना माझे प्रकाशक—

**सुलभा** : मग ? पुन्हा व्हायला हवी आहे का शोभा ?

**बाबासाहेब** : अग, चहाला दूध नाही ते मला माहीत आहे, केरसुणी आहे का तिथं ?

**गोपाळराव** : हे पाहा बाबासाहेब——

**बाबासाहेब** : मला काय लिहायला सांगतोस रे पाजी माणसा ? असलं मुकेमिळ्यांचं वाङ्मय लिहून जगण्यापेक्षा मेलेलं काय वाईट ?——

**गोपाळराव** : मग नका लिहू. पोटभर पाहिजे तर तसं लिहा. नको असलं तर काय वाटेल ते लिहा. काही तरी पुस्तक हवं असतं आम्हांला म्हणून आम्ही प्रसिद्ध करू.

**बाबासाहेब** : माझ्या पुस्तकाची तारीफ करायला कॉलमला पाच रुपये, आणि त्या माझ्या मूळ पुस्तकाला देतोस दर पानी —

**गोपाळराव** : ते बोलू नका या प्रभ्यासमोर. नाहीतर माझं सांगणं न् तुमचं सांगणं यात तफावत पडेल. तुमची इभ्रत राखली पाहिजे ना मला ? अन् असं पाहा बाबासाहेब, हा लिहून लिहून काय लिहील ? कॉलम, दोन कॉलम फार तर चार कॉलम. पानभर जाहिरातीला काही वीस रुपये पुरावयाचे नाहीत. पन्नास-साठ रुपयांचं काम वीस रुपयांत होऊन जाईल. पण तुम्हांला जर दर पानी आठ आणे वाढवले तर शेदोनशे रुपये फट्कन जातील माझे. हा व्यवहार कळायचा नाही तुम्हांला बाबासाहेब ! तुम्ही नुसती पुस्तकं लिहावी, प्रसिद्ध करण्याइतकी ही असती तर लेखक झाला नसता तुम्ही.

**बाबासाहेब** : खरंय तुझं म्हणणं. माफ कर. काय करू ? या वेळी एक कप चहासुद्धा दिला असता मी. हे पाहा सुले, पाहा ना कुठं दूध असलं तर—

**गोपाळराव** : छे ! छे ! काही नको मला. विचार करा पुन्हा मी सांगितलं

त्याचा.—बरं येऊ ?—अन् तुम्ही हो प्रभाकरपंत, येता का ? ते नवं पुस्तक निघालंय आमचं त्याच्याबद्दल बोलायचंय. शिवाय ही अभिनंदनाची सभासुद्धा भरवायची आहे—[ प्रभाकरला घेऊन बोलत बोलत निघून जातो. त्याचे वाक्य खिडकीपलीकडे संपते. ]

**सुलभा** : ( बाबासाहेबांच्या जवळ येऊन ) किती दिवस हे असं चालणार बाबा ! लिहा ना का तो म्हणतो तसं. माझी खात्री आहे, तुम्ही मनात आणाल तर लेखनाचा दर्जा न बिघडवता त्याला हवं तसं सहज लिहाल. . .पाहता काय असे मझ्याकडे ?

**बाबासाहेब** : सुले—पोरी, हत्ती थकला म्हणून काही मोटरच्या गॅरेजमधे जायचा नाही. हत्तीपेक्षा देखील मोठी होऊन बसलीय मोटर हल्ली. पण हत्ती तो हत्ती न् मोटर ती मोटर. हत्ती म्हणजे वास्तवता, मोटर म्हणजे कृत्रिमता. हत्ती म्हणजे निसर्गाचं लेकरू अन् मोटर म्हणजे निसर्गाशी झगडण्यासाठी माणसानं बनवलेलं खोटं ढोंग. हत्ती चिरंतन आहे, मोटर क्षणभंगुर आहे, म्हणूनच मी म्हटलं, की हत्ती थकला तरी मोटरीच्या गॅरेजमधे जाणार नाही. हत्तीच्या एका पायाखाली मोटरीचा चुराडा होऊन जाईल—म्हणून हत्तीचं उदाहरण दिलं मी. [ क्षणभर दोघेही स्तब्ध ] मला माहीत आहे, की माझ्या पायी तुला क्लेश सोसावे लागत आहेत. तुझ्या आईची आठवण आहे ना तुला ? असं म्हटलं असतं का तिनं ?—सांग ना, असलं घाणेरडं बुक लिहा असा आग्रह धरला असता का तिनं ?

**सुलभा** : माफ करा बाबा. माझी चूक झाली.

**बाबासाहेब** : किती क्लेश काढले तिनं माझ्यापायी. माझी ही मिजास मी सोडून द्यावी म्हणून किती जणांनी तिला किती प्रकारे चिथावणी दिली. पण बधली ती का कुठं ?—( पुन्हा क्षणभर स्तब्ध होऊन ) सुले, पुरुषाच्या अभिमानाची मूर्ती म्हणजे स्त्री. तिनं सांभाळली पाहिजे त्याची इभ्रत—ती सांभाळीत असते त्याची इभ्रत——मग ती आई असो, बायको असो, की मुलगी असो. तिच्या पाठिंब्यावर तो लढत असतो साऱ्या जगाशी. तिच्या करंगळीच्या आधारावर संकटाचा गोवर्धन पर्वत तो उचलून धरीत असतो—आठवतं ना तुला ? अन्नाशिवाय दिवस काढले आपण पण बाहेर दैन्य दिसू नाही दिलं तिनं कुणाला. इकडे उपासमार होत होती पण लोक आम्हांला सुखी समजत होते.

गुण म्हण की दोष म्हण, पण ती तिची कर्तबगारी होती. म्हणून झगडलो मी साऱ्या जगाशी. तू तिची मुलगी—माझी मुलगी—पण आता कुणाची तरी बायको झालीस म्हणून असली पुस्तकं लिहायला सांगतेस मला ! ( डोळ्यांत आलेले टीप आंगठ्याच्या टोकाने पुसून टाकतात आणि हसू लागतात. ) मी अगदी वेडा आहे नाही ग सुले ? केरसुणी आणायला सांगितली तुला मी. आणली असतीस तर मी झोडपून काढलं असतं त्याला, इतका चिडलो होतो मी—

**सुलभा** : मीच मारलं असतं कदाचित त्याला केरसुणीनं.

**बाबासाहेब** : माझीच मुलगी की नाही ! पण काय निष्पन्न झालं असतं त्यात ? माझ्या वैऱ्यांच्या यादीत आणखी एक नाव अधिक वाढलं असतं. पण वैरी तरी कसले ? पाठीमागं निंदा करतात पण समोर आले की थोबडी वळते एकेकाची—त्या कुतरड्यांत आणखी एकाची भर पडली असती एवढंच. पण आता मी फार मोठा माणूस झालोय, नाही ग सुले ? आता अशी माणसं हिशेबात धरता नयेत मी—

**सुलभा** : अन् पूर्वी कुठं धरीत होता हिशेबात ?

**बाबासाहेब** : ते खरं आहे ग, पण आता बराच मोठा झालोय मी.

**सुलभा** : खरंच का ?—मग तो लखोटा का फेकून टाकलात तेव्हा ?

**बाबासाहेब** : खट्याळ कार्टी कुठली ! अग ते माझं मत झालं. आता मी म्हटलं ते लोकांच्या दृष्टीनं. यापुढं लोक अगदी निराळ्या दृष्टीनं पाहतील माझ्याकडे—म्हणूनच असली पुस्तके लिहिता नयेत मी.

**सुलभा** : अन् पूर्वी कुठं लिहीत होता ?

**बाबासाहेब** : हा राजा कुठं गेला ?

**सुलभा** : ही माणसं आली म्हणून जाऊन येतो असं सांगितलं मला.

**बाबासाहेब** : त्याला पटलं नसतं हे. बरं झालं गेला तो. त्याची साऊट लागली त्याचा तेवढाच प्रभाव दाखवलास तू आता—

[ बाळासाहेब एकदम प्रवेश करतात. तेही एक प्रकाशक आहे. साधारण पन्नाशी उलटलेला. घेरा राखणारा, केस पिकलेला, धोतर, गुडघ्यापर्यंत लांब कोट, तांबडी पगडी, गळ्याभोवती टाकलेलं उपरणं, हातात एक हरणछाप छत्री. तो येताच सुलभा बाबासाहेबांपासून दूर जाते. ]

**बाळासाहेब :** नमस्कार बाबासाहेब—

**बाबासाहेब :** या, बसा. आज कुणीकडे इकडे ?

**बाळासाहेब :** मोठी बहार उडवलीत आपण त्या परिषदेत. वाचलं तेव्हाच मी म्हटलं, की किती झालं तरी आमचे बाबासाहेब आहेत–

**बाबासाहेब :** काय काम होतं ?

**सुलभा :** कळलं का बाळासाहेब, आमचे बाबा आता डॉक्टर झाले.

**बाळासाहेब :** आँ ! म्हणजे ? मी आलो तो फुकटच जाणार म्हणायचं !

**सुलभा :** का ?

**बाळासाहेब :** म्हणजे मी आलो होतो एक नवं पुस्तक मागायला–

**सुलभा :** मग आता कुठं बिघडलं ?

**बाळासाहेब :** आता दवाखान्याच्या नादी लागले म्हणजे कुठलं पुस्तक आणि कुठलं काय ?

**सुलभा :** तसे नव्हेत ते डॉक्टर. ती पदवी आहे युनिव्हर्सिटीची. रवींद्रनाथ टागोर आहेत ना डॉक्टर, तसेच हे.

**बाळासाहेब :** असं होय ? म्हणजे तो मान आहे वाटतं एक. बरं, बरं, छान झालं. तेवढाच खप वाढेल आता पुस्तकांचा—तेव्हा आता मुद्द्यावर येऊ या.

[ कमलेश येतो. तो एक तरुण लेखक आहे. पोशाख इंग्रजी पद्धतीचा अप-टु-डेट पण त्यात गबाळेपणा दिसतो. सदा हसतमुख, मधुभाषी, प्रत्येक भाषणात सालसपणा पूर्णपणे दाखवणारा.]

**बाबासाहेब :** ये कमलेश. बैस. अभिनंदन करायला आलायस होय ?

**कमलेश :** नाही.

**बाबासाहेब :** शाबास.

**कमलेश :** तुमचं कसलं अभिनंदन करायचं यात ! अभिनंदनच कुणाचं करायचं असलं तर ते या सनातनी युनिव्हर्सिटीचं—

**बाळासाहेब :** तेव्हा मी असं म्हणत होतो की तुम्ही जर एक—

**बाबासाहेब :** ( कमलेशला ) हा फरक तुझ्यात आणि इतरांत. म्हणूनच मला अभिमान वाटतो तुझा—

**बाळासाहेब :** आता ' गीतारहस्य ' मागं पडलं आहे—

बाबासाहेब : जाऊ द्या हो ते गीतारहस्य. हा कमा आला आहे माझा. या वेळी कसलं घेऊन बसलाहात गीतारहस्य !

कमलेश : नाही नाही. व्यवहाराची बाब असेल तर चालू द्या. मला काही घाई नाही या वेळी. अन् सुलूताई, कसं काय वाटतं ! डॉक्टर झाले ना बाबा ?

सुलभा : हो, झाले !—पण त्यांना कुठं काय वाटतं त्याचं !

बाळासाहेब : तेव्हा मी असं म्हणत होतो—

कमलेश : अन् त्यांना तरी कुठं काय वाटतंय ! परिषदेनं त्यांना आपला अध्यक्ष केलं यापेक्षा काही हे डॉक्टरेट मोठं नाही—

बाळासाहेब : तसं पाहिलं तर खूप पुस्तकं झाली आहेत तुमची. सारे विषय हाताळलेत तुम्ही. पण गीतेवर अजून काही लिहिलं नाही. धार्मिक खळबळीचा काळ आहे आजचा. अन् राजकारण म्हणजे तुमचा आवडता विषय—

कमलेश : हे मात्र अगदी बरोबर बोललात. धर्माची आणि राजकारणाची सांगड घालायचं सामर्थ्य जर कुणाच्या लेखणीत असेल तर ते बाबांच्याच.

बाबासाहेब : का रे अशी माझी बदनामी करतोस !

सुलभा : यात कसली बदनामी बाबा ! एवढे ते वेद, उपनिषदं, श्रुतिस्मृती अन् पुराणं जी पालथी घालीत असता ती उगीचंच का ?

बाबासाहेब : अग ती करमणूक आहे माझी. कथावाङ्मय निर्माण करताना शीण आला, की असलं सटरफटर काहीतरी वाचावं लागतंच—

बाळासाहेब : आता काय म्हणावं बाबासाहेब ! श्रुती, स्मृती, पुराणं म्हणजे सटरफटर का ! आपली ही आर्यसंस्कृती ज्या ग्रंथांवर आधारली आहे—

बाबासाहेब : हं, हं ! थांबा ! हे असलं काही भयंकर बोलण्यापेक्षा तुमचा तो व्यवहारच होऊन जाऊ दे आज. काय म्हणत होता ?

बाळासाहेब : हं ! असे या मुद्द्यावर. माझा प्रस्ताव असा आहे—

[राजाभाऊ येऊन मुकाट्याने कपडे काढतो. तो येत असतानाच बाबासाहेब बोलत असतात.]

बाबासाहेब : कुठं गेला होतास रे राजा !—हे बाळासाहेब आलेयत अन् हा कमलेश पण आलाय—

राजाभाऊ : ( बाजूला उभा राहून रागारागाने ) दिसताहेत मला. माझे डोळे

काही फुटले नाहीत.

**बाबासाहेब :** का रे रागावलास एवढा ?

**सुलभा :** काय झालं ?

**राजाभाऊ :** काय झालं म्हणे ! दारी चालत आलेली लक्ष्मी लाथाडून द्यायची अन्, म्हणे 'का रे रागावलास राजा !' राजा काय जीव देईल तुमच्यापुढं डोकं आपटून ?

**सुलभा :** असं बोलू नये काहीतरी अभद्रवाणं.

**राजाभाऊ :** आता काय आणखी भद्र व्हायचं राहिलंय ? तो गोपाळराव आला होता ना आता ?

**सुलभा :** हो, आले होते. मग काय झालं त्याचं ?

**राजाभाऊ :** काय झालं म्हणे ! हजार रुपये घालवले आज हातचे. आता अगाऊ पाचशे द्यायला तयार होता तो.

**बाबासाहेब :** अन् हे तुला खरं वाटलं ? आजपर्यंत त्यानं माझे किती पैसे बुडवले ते माहीत आहे ना तुला ?

**बाळासाहेब :** मोठा बुडव्या आहे तो. मला देखील चांगला हजारांचा धोका दिला आहे त्यानं. उगीच शक्तीबाहेर आकडे सांगतो अन् ते आकडे नुसते आकड्यांतच राहतात.

**राजाभाऊ :** तुम्ही गप्प बसा हो. ( बाबासाहेबांस ) त्या वेळची गोष्ट निराळी होती. आता बदलली आहे ती परिस्थिती. हेच बाळासाहेब उद्या शेकड्यानं पुस्तकं घेतील त्याच्याकडून. घरात असा हा अंधार पडलेला अन् कुठं एखादा काजवा चमकू लागला तर ते तुम्हांला खपत नाही. एवढी कसली आली आहे ही मिजास ?

**सुलभा :** उगी उगी म्हणते ना.

**कमलेश :** चुकताहात राजाभाऊ. बाबांच्या या मिजासीचाच आम्हांला अभिमान आहे. कोण आहे असा दमदार लेखक दाखवून द्या पाहू ? दसकड्यांसाठी आम्ही दारोदार हिंडतो पण हजारांसाठी देखील कुणापुढं मान झुकवीत नाहीत, म्हणूनच ना आम्ही त्यांना निवडून दिलं अध्यक्ष म्हणून.

**राजाभाऊ :** पण अध्यक्षी गाजवून परत आले तेव्हा हमालाची आणेली द्यावी

लागली मला. मान घेऊन काय चाटायचा आहे ? असेल मोटा अभिमान, पण या अभिमानाच्या जाळानं काही चूलखंड पेटत नाही. इथं पन्नास रुपड्यांसाठी मरावं लागतंय मला, तेव्हा कुठं तीन ताटं मांडली जातात. तीन महिन्यांचं भाडं थकलंय —घरवाला टाच आणतो म्हणून रोज म्हणतोय—

**बाळासाहेब** : खरंय का हे बाबासाहेब ? मग मला का नाही सांगितलं ? ( सारे खिसे चाचपून पाहतो. ) पाकीट विसरलो वाटतं —-आता गेल्याबरोबर पाठवून देतो—-पाठवून देतो पंचवीस रुपये—

**बाबासाहेब** : ऐक राजा. पंचवीस रुपये बरं—पाहिलंस ना कमा, फट्कन् पंचवीस रुपये पाठवून द्यायचा धीर केला यांनी. थोडीथोडकी रक्कम नव्हे ही— पंचवीस रुपये बरं—

**राजाभाऊ** : पंचवीस आणे तरी आहेत का खिशात ? म्हणे पंचवीस रुपये.

**बाबासाहेब** : अरे, जावई ना तू माझा ? यांच्यासमोर तरी अब्रू घेऊ नकोस माझी. मी लाचार आहे असं कळलं तर बाळासाहेबांचा दर बदलेल ना.

**बाळासाहेब** : छे, छे, छे, छे ! मी तसा माणूस नाही बरं. माझा व्यवहार अगदी चोख असतो. एकदा ठरलं की त्यात फरक व्हायचा नाही.

**कमलेश** : पण एकदा ठरतं तेच मुळी कमीत कमी रकमेत.

**बाळासाहेब** : तर काय गोप्यासारखं करू मी ? हजार ठरवायचे नि दहा द्यायचे ?

**बाबासाहेब** : ही घासाघीस कशाला ? काय म्हणणं आहे तुमचं ? होऊन जाऊ द्या एकदा. सुले, इकडे ये. [ सुलभा जवळ येऊन त्यांच्या कानाला लागते. ते कानात सांगतात. ती होकार देते आणि जाऊन राजाभाऊच्या कानाला लागते. राजाभाऊ नकारार्थी मान हालवतो. ती पुन्हा पुन्हा सांगते—तो निश्चितपणे नकार देऊन बाजूला होतो. बाकीचे तिघे आपापल्या परीने पाहात असतात. ] बरं बरं, राहू दे. हं, बाळासाहेब, काय म्हणत होता ?

**बाळासाहेब** : मी असं म्हणत होतो, आजच्या हिंदुसभेच्या दृष्टीनं गीतेवर एखादं पुस्तक—चांगलं पाचशे पानांचं लिहा. तशी दहा फॉर्म, अकरा फॉर्म अशी काही अट नाही—

**राजाभाऊ** : काय द्याल ?

**बाळासाहेब** : पानाला एक रुपया, पंचवीस रुपये आगाऊ, पुरं पुस्तक हातीं येताच आणखी पाऊणशे, आणि पुस्तक छापून प्रसिद्ध झाल्यानंतर दर महिन्याला पन्नास प्रमाणे आठ महिन्यांत सारी बाकी चुकती करून टाकायची.

**बाबासाहेब** : हे पुस्तक लिहायला किती दिवस लागतील असं वाटतं तुम्हांला ?

**बाळासाहेब** : ते तुमचं तुम्ही पाहा. पुरं पुस्तक हाती येताच पाऊणशे.

**कमलेश** : कमीत कमी सहा महिने तरी लागतील. गीतारहस्य लिहिण्यासाटी टिळकांना सहा वर्षे लागली—अन् तीही तुरुंगात. अन्नवस्त्राची काळजी नव्हती तिथं. पुस्तक लिहायला हाती घेतलं की बाकी सारी किरकोळ कामं बंद ठेवावी लागतील—

**बाबासाहेब** : अन् तोपर्यंत या पंचवीस रुपयांवर चैन करीत काम करायचं आम्ही ! कबूल आहे तुला राजा ? तुला पत्करत असलं तर होय म्हणतो.

**राजाभाऊ** : पंचविसात कसं भागेल बाळासाहेब ?

**बाळासाहेब** : मग पन्नास देतो. पुस्तक पुरं होताच बाकीचे पन्नास.

**बाबासाहेब** : ( राजाभाऊला ) आहे कबूल ?

**राजाभाऊ** : मग गोपाळरावांचंच काम घ्या आधी. तो शंभर रुपये देतोय आगाऊ. अन् अडीचशे पानांचं पुस्तक पुरं होताच आणखी शंभर. चार रुपये पेजप्रमाणे देणार आहे तो हजार रुपये.

**बाबासाहेब** : काय ग सुले ? गोपाळरावांचं काम घेऊ ?

**सुलभा** : नाहो.

**बाबासाहेब** : ऐक राजा.

**सुलभा** : असली पुस्तकं नाही लिहायची बाबांनी. त्यापेक्षा भीक मागितलेली काय वाईट ?

**बाळासाहेब** : म्हणूनच मी म्हणतो, की रुपया पेज मिळालं तरी इभ्रत वाढेल.

**कमलेश** : अन् देणंही वाढेल—कुणी दिलंच तर हं !

**बाबासाहेब** : काय रे राजा, आता बोलत का नाहीस ?

**राजाभाऊ** : मला वाटतं, गोपाळरावांचं काम हाती घ्यावं.

**सुलभा** : नाही—मला वाटतं, कमी पैसे असले तरी बाळासाहेबांचंच काम घ्यावं

**बाबासाहेब** : ठीक ठीक ! आता असं पाहा बाळासाहेब, तुमचं हे पुस्तक मी कसं लिहीन ते सांगतो. महाभारत हा माझा मोठा आवडता ग्रंथ आहे. इतकी सुंदर कादंबरी कुणाही ग्रंथकारानं अजून लिहिली नाही. त्या सुंदर कादंबरीत कुणा तरी चोरानं हे गीतेच बांडगूळ रिचवून दिलंय. साऱ्या उपनिषदांतलं तत्त्वज्ञान घेऊन त्याची खिचडी उडवून दिलीय या गीतेत. त्या तत्त्वज्ञानांत कुठंच कसला मेळ बसत नाही हे सप्रमाण सिद्ध करून दाखवतो. शंकराचार्यांपासून टिळकांपर्यंत साऱ्या टीकाकारांना एकजात खोडून काढतो—

**बाळासाहेब** : छे, छे, छे, छे ! कुत्रासुद्धा हाती घ्यायचा नाही असलं पुस्तक. तुम्हांला तो आपला गोप्याच बरा. [उपरणे गळ्यात टाकून छत्री सावरून जाण्यासाठी उठतो. ]

**कमलेश** : ( त्याचा हात धरून त्याला बसवीत ) थट्टासुद्धा कशी कळत नाही तुम्हांला बाळासाहेब ? बसा. [ बाळासाहेब बसतो. ]

**बाबासाहेब** : ही थट्टा नव्हे कमा, अगदी प्रामाणिक मत आहे ते माझं. फार दिवसांपासून माझी इच्छा होती की असं एक पुस्तक लिहावं म्हणून. म्हणून तर मी होय म्हटलं. फार परिश्रम पडणार आहेत ते पुस्तक लिहायला. कितीतरी पुस्तकं चाळून नोट्स काढाव्या लागतील, किती आधार पाहावे लागतील, मराठी आणि इंग्रजी पुस्तकांबरोबरच जुने संस्कृत टीकाकार आणि वैष्णवकालीन टीकाकार उलथावे लागतील—तसं पाहिलं तर वर्ष दोन वर्षांचं काम आहे हे—पण यापूर्वी बरंचसं चाळून झालंय माझं—

**बाळासाहेब** : पण एवढं सारं करून तुम्ही ठरवणार काय, की ही सारी खिचडी आहे म्हणून ?—

**बाबासाहेब** : अर्थात !

**बाळासाहेब** : मग तुमचं पुस्तक मला नको आहे. ( उठतो. )

**राजाभाऊ** : बसा हो—( राजाभाऊ एक खुर्ची घेऊन बाळासाहेबांशेजारी बसतो. ) गीतेमुळंच काय अडलंय बाळासाहेब ? आपण दुसऱ्या एखाद्या पुस्तकाबद्दल बोलू—

**कमलेश :** हो एखादी नवी कादंबरी—

**बाळासाहेब :** कादंबऱ्या आता पुरे झाल्या. यंदाच्या मॅट्रिकला लावलेल्या मराठी पुस्तकांवर नोटस् लिहिता ?

**बाबासाहेब :** त्यापेक्षा अंकलिपी लिहायला सांग ना मला—तोंडचे हिशेब—जमाखर्चाची पद्धती—

**राजाभाऊ :** जमाखर्चाची पद्धती माहीत असती तर ही दशा का आली असती ? ते राहू द्या. नोटस् लिहिल्या तर काय द्याल ?

**बाळासाहेब :** दोनशे पानांपर्यंत पानी बारा आणे. पुढं दर पानी आठ आणे.

**कमलेश :** सरसकट रुपया धरा ना पानाला.

**बाळासाहेब :** सरसकट बारा आणे फार तर.

**राजाभाऊ :** नाही नाही—पानी रुपया.

**बाळासाहेब :** बरं. होऊन जाऊ दे. रुपया ! पानी रुपया दिला तर मला काही राहायचं नाही त्यात. छपाईलाच जातील सारे पैसे. पण बाबासाहेबांना काही तरी दिल्याचं श्रेय मिळतंय—ठीक ठीक. कबूल—पानी रुपया.

**बाबासाहेब :** अगदी ठरवून सुद्धा टाकलंत ? अन् तू सुद्धा सामील झालास त्यात कमा ? अन् तू ग सुले ?

**सुलभा :** मला काही कळत नाही या व्यवहारात.

**बाबासाहेब :** कुठल्यातरी चार-पाच गाढवांनी दुसऱ्या कुठल्यातरी दहा-पाच मूर्खांच्या पुस्तकातल्या काढलेल्या उताऱ्यांवर मी नोट्स् लिहू ? माझी खेटरं पुसायची तरी लायकी आहे का त्या लेखकांची ?

**सुलभा :** नाही ! नोट्स् लिहायच्या नाहीत. दुसरं कसलं तरी पुस्तक ठरवा.

**बाळासाहेब :** हे पाहा बाबासाहेब, मी धंदेवाईक माणूस आहे. तुमच्या लहरीप्रमाणं तुम्ही कसलं तरी पुस्तक लिहावं, मी ते पैसे घालून छापावं अन् शेवटी माझे ते पैसे जावे गोडाऊनमध्ये, एवढी काही माझी श्रीमंती वर आलेली नाही. माफ करा अं. पण मी असं म्हणतो, की हट्टाला देखील काही मर्यादा आहे. किती दिवस आता तुम्ही ( राजाभाऊकडे पाहून ) दुसऱ्याच्या जिवावर जगणार ? ही असली मिजास काय कामाची ? जरा धंदेवाईक दृष्टीनं पाहा. असं हवेत तरंगत राहिलं तर पायाला जमीन लागत नाही. अन् जमिनीवर पाऊल

ठाम रुतल्याशिवाय पोटभर अन्न मिळायचं नाही बाबासाहेब. माफ करा अं—माफ करा मंडळी—येतो बरं सुलूताई—माफ करा अं—( जायला निघतो. )

**सुलभा** : ( दरवाजाजवळ त्याला अडवून ) दुसरा काहीच मार्ग नाही का बाळासाहेब ?

**बाळासाहेब** : ना—ही—! हा धंदा आहे सुलूताई. येतो मंडळी. नमस्कार. [ जातो. ]

[ क्षणभर सर्वत्र स्तब्धता. ]

**बाबासाहेब** : ( तिरस्काराने आपल्याशीच हसत ) असा आहे हा धं—दा !-काय रे कमा, बुद्धी विकल्याशिवाय धंदाच होत नाही का रे ? त्याशिवाय पोटच नाही का रे भरत ?

**राजाभाऊ** : मिळवता जावई असला की झालं. त्याच्या जिवावर करावी मिजास. पण त्याला शेकड्यांनी पगार मिळत नाही हे कुणी घ्यायचं ध्यानी ?

**बाबासाहेब** : ऐकलंस कमा, हा माझा मोठेपणा ! हे माझं अध्यक्षपद ! हे माझं डाक्टरेट ! मोठी गंमत आहे ही, नाही सुले ! एक मुलगी होती तुझ्यासारखी—अन् तिचं लग्न करून दिलं एका पगारवाल्याबरोबर म्हणून राहिलोय जगून. मोठे उपकार आहेत तुमचे माझ्यावर. नाहीतर कुठंतरी उपासपोटी मेलो असतो—

**कमलेश** : असं का म्हणता बाबा ? यात काहीच का तडजोड नाही व्हायची ? प्रत्येक बाबतीत असा हट्ट धरून कसं चालेल ? मी पोर आहे आपलं. पण जीव राहात नाही म्हणून बोलतो—यातून काही तरी तोड काढली पाहिजे.

**बाबासाहेब** : तोड एकच. कुठं तरी नोकरी धरायची. पोटापुरता पगार मिळत असला दुसरीकडून, की मग हे सारे धंदेवाईक लोक आपोआप येतील वठणीवर. मी लाचार आहे असा, म्हणून आपल्या गुडघ्याखाली माझी मुंडी दाबताहेत अशी !—आहे कुठं नोकरी मला मिळण्याजोगी ?

**सुलभा** : भलतंच काय बोलता बाबा ? आता यानंतर का तुम्ही नोकरी करायची ?

**बाबासाहेब** : तर मग काय करू ? किती दिवस दुसऱ्याच्या जिवावर जगू ?

**राजाभाऊ** : दुसऱ्याच्या जिवावर जगायची खंत वाटते तर चार व्यवहारी

माणसारखं वागावं. त्या दुसऱ्याची थोडी काळजी बाळगावी. त्या दुसऱ्याचे कसे हाल होतायत हे थोडं ध्यानी घ्यावं— थोडं दुसऱ्याचं ऐकावं—त्या वेळी ऐकलंत, म्हणून ना डॉक्टरेट मिळालं ?

**कमलेश** : म्हणजे ?

**बाबासाहेब** : म्हणजे काय ते मी सांगतो. याच्या त्या महामूर्ख व्हाईस-चॅन्सेलरनं अर्थशास्त्रावर एक पुस्तक लिहिलं होतं. अर्थात सर्वांनी त्याच्यावर टीका केली— 'टाईम्स' नं सुद्धा 'कन्डेम' केलं ते पुस्तक. यानं सांगितलं मला अन् मी समर्थन केलं त्या पुस्तकाचं—

**कमलेश** : एक नमुनेदार परीक्षण होतं ते. 'टाईम्स' सुद्धा चीत झाला त्यामुळं.

**बाबासाहेब** : मूळ पुस्तक वाचलं होतंस तू ?

**कमलेश** : नाही. पाहिलं सुद्धा नाही.

**बाबासाहेब** : मोठा भाग्यवान आहेस. या राजाच्या नादी लागून स्वतःची बुद्धी एकदा अशी मी विकली—म्हटलं, याला काही प्रमोशन मिळेल—याच्याकडेसच्च बोलला होता ना तो व्हाईस-चॅन्सेलर ! पण झालं काय ? डॉक्टरेट मिळालं मला अन् याचे पन्नासाचे काही एकावन झाले नाहीत. आता असं कर राजा, ही माझी पदवी गहाण ठेव कुणातरी सावकाराकडे अन् काढ त्याच्यावर पैसे. तुझ्या साहेबाच्या खुर्चीखाली मुंडी घातल्याचं मिळू दे मला बक्षीस.

**राजाभाऊ** : ( सुलभेला ) ऐक—ऐक—ऐक ही तुझ्या पिताजींची मुक्ताफळं. माझ्या एवढ्या उठाठेवीचं हे बक्षीस. कृतघ्न आहात झालं !

**कमलेश** : हं, हं, राजाभाऊ—राजाभाऊ, तोंड आवर. काय बोलतोस हे ?

**राजाभाऊ** : उनाडटप्पू तू–घर नाही. दार नाही–बायको नाही,—बिऱ्हाड नाही—चार आण्याच्या प्लेटीवर पोट भरीत मुंबईभर भटकणारा तू साहित्यक —एकदा लग्न करून पाहा—बिऱ्हाड थाटून पाहा—अन् बायकोबरोबर एक सासराही घेऊन ये घरी. मग कळतील माझ्या हालअपेष्टा—

**सुलभा** : ( कमलेशला ) तम्ही जा पाहू आता.

**राजाभाऊ** : का जा ? मी खोटं बोललो ? विटंबना चाललीय माझी तुम्हा

लोकांपायी.

**सुलभा** : आता मी धरते नोकरी कुठं तरी.

**राजाभाऊ** : कोण देणार नोकरी तुला ? बी. ए. बी. टी. बायका फिरतायत दारोदार. तू नुसती मॅट्रिक झालेली—ट्रेन्ड असतीस तर म्युनिसिपालिटीत तरी नोकरी मिळाली असती—

**सुलभा** : शॉर्टहॅन्ड टायपिंग मी शिकते म्हटलं तर ते पटेना तुम्हांला.

**राजाभाऊ** : म्हणजे आपल्या हातानं कुणा सावकारसॉलिसिटरच्या खोलीत घालू तुला ?

**कमलेश** : काय बोलतोयस हे राजाभाऊ ?

**राजाभाऊ** : एकदा लग्न करून पाहा—

**कमलेश** : एवढं पाहिल्यावर ? छे, नको रे बुवा !

**सुलभा** : आता जा पाहू तुम्ही कमलेश. उद्या दुपारी या मग सावकाश.

**बाबासाहेब** : ( आपल्याशीच ) उद्या दुपारी ! ( हसत कमलेशला ) हो उद्या दुपारीच ये. त्या वेळी कुणाचासुद्धा उपसर्ग व्हायचा नाही तुला. उद्या दुपारीच ये. मग आपण खूप चर्चा करू मनमुराद.

**कमलेश** : येतो तर—नमस्कार—नमस्कार—नमस्कार. उद्या दुपारी बरं सुलूताई—[ जातो.]

**बाबासाहेब** : उद्या दुपारी !

**सुलभा** : काय म्हणता बाबा ?

**बाबासाहेब** : असं म्हणतो, हे आता व्हायचं कसं ? मी हा असा नालायक माणूस. मी होऊन ही माझी मोट तुमच्या माथी ठेवली—आता पश्चात्ताप होतो मला !—त्या वेळी वाटलं होतं, की माझा काही तरी उपयोगच होईल तुम्हांला म्हणून—

**राजाभाऊ** : हं !

**बाबासाहेब** : खरंय ते. माझा गैरसमज होता तो. तुझाच उपयोग झाला मला. मी मात्र एक गलत्ग्रह होऊन बसलो तुम्हांला.

**राजाभाऊ** : पण का ?

**बाबासाहेब** : माझ्या मिजासखोरीमुळं.

**राजाभाऊ** : मग सोडा ती.

**बाबासाहेब** : ते शक्य नाही. आता फार जुनवट होऊन गेलोय मी. निर्ढावलोय—माजलोय.

**सुलभा** : बाबा, बाबा, नका हो असं बोलू तुम्ही तरी.

**बाबासाहेब** : खरोखरच माजलोय. मस्ती आलीय मला. माझ्या मस्तवाल-पणापुढं तुम्हा पोराबाळांच्या कल्याणाची पर्वा वाटत नाही मला, इतका माजलोय.

**राजाभाऊ** : ते काही खोटं नाही.

**सुलभा** : उगी म्हणते ना.

**बाबासाहेब** : कोण म्हणतो खोटं म्हणून ? पण असं आहे ते, आता काही माझ्यात फरक होणं शक्य नाही.

**राजाभाऊ** : होय ना ? मग आता मी काय करू ? शंभर का होईनात, पण त्या गोपाळरावानं आज दिले असते. ते लाथाडलेत. आता हे पन्नास–म्हटलं पन्नास तर पन्नास, तेवढेच दिले असते घरवाल्याला--- हिच्या अंगावर आता फुटका मणीसुद्धा राहिला नाही---माझी सोन्याची बटनंसुद्धा विकली---घड्याळ विकलं,---तुम्हीच दिलं होतं ते लग्नाच्या वेळी---

**बाबासाहेब** : दोनशे रुपये मिळाले होते तेव्हा एका पुस्तकाचे—एकदम. आता मला वीक ना कुठं तरी.

**राजाभाऊ** : कुणाला हवाय हा असला हत्ती पोसायला ? आता हिला तेवढी सिनेमात पाठवायची राहिलीय.

**बाबासाहेब** : मग जा की सुले. त्यात काय वाईट आहे ? मग यालासुद्धा नको नोकरी करायला.

**राजाभाऊ** : आता तुमची मुलगी नाही ती. बायको आहे माझी. अजून मला माझी बायको हवी आहे.

**बाबासाहेब** : मोठा प्रेमळ नवरा आहे हा, नाही ग सुले ?

**सुलभा** : ( राजाभाऊला ) आता पुरे कराल ही बोलणी ?

**राजाभाऊ** : कोण बोलतोय ? मी की तुझा बाप ? चटके बसताहेत मला आणि रडतेयस तू !—माझ्यासाठी नव्हे, आपल्या बापासाठी. आता पुरे झालं हे.

या क्षणाला या गोष्टीचा निकाल लागला पाहिजे बाबासाहेब. गोपाळरावांसाठी कादंबरी लिहिणार ?

**बाबासाहेब :** नाही.

**राजाभाऊ :** अन् बाळासाहेबांची बुकं ?

**बाबासाहेब :** नाही. एकदा तुझं ऐकलं. त्याचं फळ मिळालं हे डॉक्टरेट. पण मनाला सारख्या टोचण्या लागल्या आहेत तेव्हापासून. केवढा अधःपात होता तो माझा !

**राजाभाऊ :** मग आता काय करणार ?

**बाबासाहेब :** मी काय सांगू ?

**राजाभाऊ :** आता माझी शिकस्त झाली. उद्या सकाळी घरवाला येईल. सामानसुमान बाहेर काढील. ती शोभा सहन करायची ताकद नाही माझ्यात. बोला, काय करणार पुढं ?

**बाबासाहेब :** तुला काय वाटेल ते कर. तुझा तू मुखत्यार आहेस.

**राजाभाऊ :** हे चांगलं माहीत होतं मला—[ आतल्या खोलीत जातो. ]

**सुलभा :** बाबा !

**बाबासाहेब :** काय पोरी ?

**सुलभा :** यात काही तडजोड नाही का निघायची ?

**बाबासाहेब :** नाही—नाही—नाही ! मेलो तरी बेहत्तर पण यापुढं मी माझी लेखणी चोरांना विकणार नाही. या चोरांची घरं भरण्यासाठी काय मी माझं तोंड नरकात खुपसू ?—मरावं मी—रक्त आटवावं मी —माझ्या लिहिण्यावर यांचे बंगले उभारताहेत अन् मी इथं एका पैशाला महाग झालोय. पाहुण्याला द्यायला चहालासुद्धा पैसा नाही माझ्याकडे. आमचं रक्त पिळून पिताहेत हे, त्यांच्या पायांवर डोकं घासू ? नाही. अन्नावाचून तडफडून मेलो तरी नाही—नाही—-नाही.

[ हे भाषण चालत असता राजाभाऊ आतलं सामान आणून दाराजवळ ठेवीत असतो. बाबासाहेब ते पाहात नाहीत. सुलभा मात्र दोघांकडेही सारखी पाहात उभी असते. ]

**सुलभा :** ( राजाभाऊला ) हे काय चाललंय ? ( ओरडून ) मी विचारते, काय

चाललंय हे ?

**राजाभाऊ** : ( उत्तर न देता गॅलरीत जाऊन ) हमाल, ए कुली, ए पाटीवाला—वर या दोघेही..

**सुलभा** : कुठं चाललात ?

**राजाभाऊ** : हे स्वप्न मला पडलंच होतं. खोली ठरवून आलोय मी. एक खोली पुरेल आम्हांला. उद्या घरवाला येऊन शोभा व्हायच्यापूर्वी निघालं पाहिजे येथून.

**सुलभा** : अन बाबा ?

[ दोन हमाल येतात. ]

**राजाभाऊ** : उचला हे सामान नि घ्या खाली—( बाबासाहेबांस ) तुमच्या तनसडीला सुद्धा हात लावला नाही मी ! तुम्ही घेतलेली भांडीकुंडी पडली आहेत तिथंच—चल सुलभा.

**सुलभा** : बाबांना इथं टाकून !

**राजाभाऊ** : नाहीतर राहा इथंच--( सामान हमालाच्या डोक्यावर चढवतो. )

**बाबासाहेब** : सुले, तो भांडीसुद्धा घेऊन जा. आयत्या वेळी भांडी मिळायची नाहीत जेवणाची.

**राजाभाऊ** : डबा आणू तोपर्यंत. काही नकोत ती भांडी.

**बाबासाहेब** : ती भांडी घेऊन जा सुले. [ सुलभा एकदम रडू लागते ] रडतेयस पोरी ? यात रडायला काय झालं ! मी जिवंत आहे म्हणून तुला रडावं लागतं. यापूर्वी मेलो असतो तर इतक्यात डोळे पुसून मोकळीसुद्धा झाली असतीस ! जा आता !

**सुलभा** : कशी जाऊ !

**राजाभाऊ** : चल लवकर. उशीर होतोय—[ बाबासाहेब उठून आत जातात. ]

**सुलभा** : बाबांना टाकून ! इथं ! एकटेच ! कोण पाहील त्यांच्याकडे !

**राजाभाऊ** : त्यांची मिजास ! त्यांची मस्ती ! त्यांचा अभिमान ! अन् आहेतच की त्यांची भगत मंडळी !

**सुलभा** : बिचारे दरिद्री ते. स्वतःचंच होत नाही—( जवळ जाऊन ) गेलंच पाहिजे का !

**राजाभाऊ :** हमाल वाट पाहताहेत खाली !

[ बाबासाहेब आतून वाळत घातलेले सुलभेचे कपडे आणि एक पुस्तकांचा धोतरात बांधलेला गठ्ठा घेऊन येतात. ]

**बाबासाहेब :** हे तुझे वाळत घातलेले कपडे—अन् ही माझी पुस्तकं.

**राजाभाऊ :** काही नकोत ती दरिद्री पुस्तकं.

**बाबासाहेब :** एवढी राहू देत तुझ्याकडे सुले. माझे पंचप्राण आहेत हे. माझा मुडदा इथं असला तरी हे एवढे माझे प्राण राहू देत तुझ्या आसपास. (हसून) रडतेस काय पोरी, केव्हातरी व्हायच्चंच होतं हे. तसं नाही असं ! माझा आशीर्वाद आहे तुला. जा. सुखी हो— पाहू नकोस मागं वळून - [ असे म्हणून तिला आपल्या हाताने धरून गॅलरीबाहेर घालवतात. ती जाताना कपडे आणि पुस्तकाचे बोचके नेते. ]

**राजाभाऊ :** ( कठोरपणे ) नमस्कार.

**बाबासाहेब :** नमस्कार.

[ राजाभाऊला एकदम भडभडून येते आणि तो बाबासाहेबांच्या पायांवर डोके ठेवतो. त्याला उठवून ते पोटाशी घट्ट धरतात ]

**बाबासाहेब :** ( हसतमुखाने ) जा बाळ. ईश्वर तुझे कल्याण करो—माझा आशीर्वाद आहे तुला. माझी सेवा केली आहेस तू. मी विसरणार नाही ती. मी कृतघ्न नाही, राजा, मी कृतघ्न नाही ! जा आता. ईश्वर तुझं—काय वेडा आहे मी ! जुनी सवय आहे ना ती ! ढोंग ! बनाव सारा ! ईश्वर म्हणे ? —जा आता राजा. सुली वाट पाहते आहे खाली—

[ त्यालाही लोटून बाहेर घालवतात. गॅलरीच्या कठड्याला टेकून हसतमुखाने खाली पाहात असता रडण्याचा येत असलेला उमाळा ते दाबीत असल्याचा भास होतो. काही वेळाने आत येतात. खुर्चीवर बसतात. चोहीकडे पाहतात. हात लांब करून एक जांभई देतात आणि आपल्याशीच खुष झाल्याप्रमाणे हळूहळू हसू लागतात. त्या हसण्यात त्यांच्या चरित्राचे सारे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते. ]

—पडदा—

55474
16-11-76

मामा वरेरकरांनी आपल्या नाट्यलेखनात सतत पन्नास वर्षे नवनवीन प्रयोग केले. तंत्राच्या दृष्टीने आणि विषयवैचित्र्याच्या दृष्टीनेही, ते नेहमी काळाच्या आणि तत्कालीन कलाभिरुचीच्या एक पाऊल पुढेच राहिले.

त्यांच्या या नाट्यलेखनात 'सा र स्व त'ला विशेष स्थान आहे. 'सा र स्व त' हे रूढ परंपरेनुसार तीन अंकांचे नाटक नाही. तर दोन प्रकरणांचे हे नाटक आहे आणि त्याचे वैशिष्ट्य हे, की दोन्ही प्रकरणे नाट्यवस्तूच्या दृष्टीने परस्परांस जितकी संलग्न तितकीच आपापल्यापरीने वेगवेगळी आहेत. शिवाय या नाटकात एखादी व्यक्ती ही नायक नाही तर महत्त्वाचे स्थान ' नाट्यवस्तूला' आहे

ह्या नाटकाचा दुसरा विशेष म्हणजे हे नाटक लेखकाच्या मनोवृत्तींचा, प्रेरणांचा आणि त्याच्या जीवननिष्ठांचा वेध घेते. 'चढती पायरी' ह्या पहिल्या प्रकरणात स्थूलमानाने लेखकाचा वास्तववादी दृष्टिकोन व्यक्त होतो तर 'शिखरावरून' ह्या दुसऱ्या प्रकरणात त्याच्या आत्मनिष्ठेचे, त्याच्या सत्त्वाचे आणि माणुसकीचे दर्शन घडते. त्यामुळे एका वेगळ्या अर्थाने हे नाटक म्हणजे आत्मशोधन करणारी एक कलाकृती आहे.

आजही जाणवणारा तंत्र आणि विषय यांचा नवेपणा हीच काही ह्या नाटकाची वैशिष्ट्ये नाहीत; तर अकृत्रिम सहजता, सच्चेपणा आणि नाट्यकृती व्यक्तीप्रधान नसतानाही लेखकाने प्रभावीपणे उभी केलेली भाऊसाहेब व बाबासाहेब ही व्यक्तिचित्रे ह्या नाटकाला 'विशेषस्थान' मिळवून देतात.

Library IIAS, Shimla
MR 891.462 V 425 S
00055474

किंमत : रुपये पाच